aglasem.com

FOR KARNATAKA CLASS 10 PREPARATION

Karnataka SSLC Question Bank 2027 Mathematics (Marathi Medium)

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
Karnataka Class 10	2027	Question Bank	Maths

ಕರ್ನಾಟಕ ಸರಕಾರ

ಶಾಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ಸಾಕ್ಷರತಾ ಇಲಾಖೆ

ಸರಕಾರಿ ಶಿಕ್ಷಕರ ಶಿಕ್ಷಣ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯ (CTE), ಬೆಳಗಾವಿ

ಪಾಠ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಾಂಕನ ಸಾಮಗ್ರಿ

2026-27

ಮಾಧ್ಯಮ: ಮರಾಠಿ

ವಿಷಯ :ಗಣಿತ

ತರಗತಿ :10

ರಾಜ್ಯ ಶಿಕ್ಷಣ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಇಲಾಖೆ,

ಬನಶಂಕರಿ ಮೂರನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು -560085

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com Page 1 of 432

ಪರಿಕಲ್ಪನೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ	
ಶ್ರೀಮತಿ ರಶ್ಮಿ ಮಹೇಶ್. ಭಾ.ಆ.ಸೇ ಸರಕಾರದ ಪ್ರಧಾನ ಕಾರ್ಯದರ್ಶಿಗಳು, ಶಾಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ಸಾಕ್ಷರತಾ ಇಲಾಖೆ.	
ಶ್ರೀ. ವಿಕಾಸ್ ಕಿಶೋರ್ ಸುರಳ್ಕರ್ ಭಾ.ಆ.ಸೇ ಆಯುಕ್ತರು, ಶಾಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ಸಾಕ್ಷರತಾ ಇಲಾಖೆ, ಬೆಂಗಳೂರು	ಶ್ರೀಮತಿ ಡಾ. ಕೆ ವಿದ್ಯಾಕುಮಾರಿ ಭಾ.ಆ.ಸೇ ರಾಜ್ಯ ಯೋಜನಾ ನಿರ್ದೇಶಕರು ಸಮಗ್ರ ಶಿಕ್ಷಣ ಕರ್ನಾಟಕ ಬೆಂಗಳೂರು
ಶ್ರೀ. ಕೆ . ಜಿ. ರಂಗಯ್ಯ ನಿರ್ದೆಶಕರು, ಡಿ.ಎಸ್.ಇ.ಆರ್.ಟಿ ಬೆಂಗಳೂರು	
ಮಾರ್ಗದರ್ಶಕರು ಮತ್ತು ಪರಿಶೀಲಕರು	
ಶ್ರೀ. ಪಾರಿ ಬಸವರಾಜ ಪ್ರಾಚಾರ್ಯರು, ಸರಕಾರಿ ಶಿಕ್ಷಕರ ಶಿಕ್ಷಣ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯ, (CTE) ಬೆಳಗಾವಿ	1. ಡಾ.ರಾಘವೇಂದ್ರ ಪಿ.ಕೆ 2. ಶ್ರೀಮತಿ ಬಿ.ಜೆ ಪೀರಜಾದೆ ಸರಕಾರಿ ಶಿಕ್ಷಕರ ಶಿಕ್ಷಣ ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯ, (CTE) ಬೆಳಗಾವಿ
ಸಮನ್ವಯ	
ಶ್ರೀಮತಿ ರಾಧಾ ಪಿ, ಹಿರಿಯ ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಡಿ.ಎಸ್.ಆರ್.ಟಿ ಬೆಂಗಳೂರು	
ಅನುವಾದಕ ಸಮೀತಿ	ಪರಿಷ್ಕರಣಾ ಸಂಪನ್ಮೂಲ ತಂಡ
ಶ್ರೀ ಎ.ಎನ್ ಗಾವಡೆ ಮುಖ್ಯ ಶಿಕ್ಷಕರು, ಸರಸ್ವತಿ ವಿದ್ಯಾ ಮಂದಿರ ಕಿಣೇಯ.	ಶ್ರೀ ಕೋಮಲ ಗಾವಡೆ ಜ್ಯೋತಿ ಹೈಸ್ಕೂಲ ಕರ್ಲೆ.
ಶ್ರೀ ಜೆ.ಎಸ್.ಪಾಟೀಲ ಮುಖ್ಯ ಶಿಕ್ಷಕರು, ದೇಸೂರು ಹೈಸ್ಕೂಲ ದೇಸೂರು.	ಶ್ರೀ ಜ್ಯೋತಿಬಾ ಕಡೇಮನಿ ಸರಸ್ವತಿ ಹೈಸ್ಕೂಲ್ ಹಂದಿಗನೂರ
ಶ್ರೀ ಎಸ್.ಕೆ.ಪಾಟೀಲ ಸರಸ್ವತಿ ಹೈಸ್ಕೂಲ ಹಂದಿಗನೂರು.	ಪರಿಶೀಲಕರು: ಶ್ರೀ ಕೋಮಲ ಗಾವಡೆ ಜ್ಯೋತಿ ಹೈಸ್ಕೂಲ ಕರ್ಲೆ.
ಶ್ರೀ ಲಕ್ಷಣ ಕಾಲಮನಕರ ಪೀರನವಾಡಿ ಹೈಸ್ಕೂಲ ಪೀರನವಾಡಿ.	

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

ಶ್ರೀ ಬಾಲಕೃಷ್ಣ ಜಾಧವ ಜನತಾ ಹೈಸ್ಕೂಲ ಬಾಳೇಕುಂದ್ರಿ	
ಶ್ರೀ ಎ.ಬಿ.ಮಜುಕರ ಸಹ-ಶಿಕ್ಷಕರು ಶಿವಾಜಿ ಹೈಸ್ಕೂಲ ಯಳ್ಳೂರು.	
ಶ್ರೀ ಜೆ.ಜಿ.ಹಲಗೇಕರ ಸಹ ಶಿಕ್ಷಕರು, ಭಗತಸಿಂಗ್ ಹೈಸ್ಕೂಲ ಅಂಬೇವಾಡಿ.	
ಶ್ರೀ ಡಿ.ಎಲ್.ಕೋತೆಕರ ಶಿವಾಜಿ ಹೈಸ್ಕೂಲ ಕಡೋಲಿ.	
ಶ್ರೀ ಕೋಮಲ ಗಾವಡೆ ಜ್ಯೋತಿ ಹೈಸ್ಕೂಲ ಕರ್ಲೆ.	
ಶ್ರೀಮತಿ ಸೋನಾಲಿ ಚಿಟ್ಟಿ ವ್ಹಿ.ಎಸ್.ಪಾಟೀಲ ಹೈಸ್ಕೂಲ ಮಚ್ಛೆ.	
ಶ್ರೀ ಕೋಬನ ಡುಕರೆ ವಿಠ್ಠಲ ರಾಮಜಿ ಶಿಂಧೆ ಹೈಸ್ಕೂಲ ರಣಕುಂಡೆ.	
ಶ್ರೀ ಹರಿ ಪಾಟೀಲ ಡಾ. ಬಾಬಸಾಹೇಬ ಅಂಬೇಡ್ಕರ ಕೇದನೂರು.	
ಪರಿಶೀಲಕರು: 1. ಶ್ರೀ ಸುನೀಲ ಕುಬ್ರೆ, ಬಿ.ಆರ್.ಪಿ. ಬೆಳಗಾವಿ ಗ್ರಾಮೀಣ 2. ಶ್ರೀ ಎ.ಎನ್ ಗಾವಡೆ ಮುಖ್ಯ ಶಿಕ್ಷಕರು, ಸರಸ್ವತಿ ವಿದ್ಯಾ ಮಂದಿರ ಕಿಣೇಯ.	

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com Page 3 of 432

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग

सरकारी अध्यापक शिक्षण महाविद्यालय (CTE), बेळगाव

अध्ययन-आधारित मूल्यमापन प्रश्न बँक २०२६-२६

गणित

१० वी

इयत्ता

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण विभाग,

बनशंकरी तिसरा टप्पा, बेंगळुरू-५६००८५

प्रकरण १ : वास्तव संख्या

अध्ययन निष्पत्ती

1. यापूर्वी अभ्यासलेल्या संख्यांच्या गुणधर्मांचे व त्यांच्यातील संबंधांचे सामान्यीकरण करून अंकगणिताचा मूलभूत प्रमेय विकसित करणे आणि दिलेल्या संयुक्त संख्यांचे मूळ संख्यांच्या गुणाकाराच्या स्वरूपात रूपांतर करणे.

2. दिलेल्या संख्यांचा म.सा.वि. व ल.सा.वि. शोधणे, तसेच दोन संख्यांचा गुणाकार आणि त्यांच्या म.सा.वि. व ल.सा.वि. यांच्या गुणाकारामधील संबंध पडताळणे आणि दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी म.सा.वि. व ल.सा.वि.चा उपयोग करणे.

3. विरोधाभास पद्धतीचा वापर करून दिलेल्या अपरिमेय संख्या अपरिमेय असल्याचे सिद्ध करणे.

I. खालील प्रत्येक प्रश्न / अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा व त्याच्या अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा.

(१ गुण)

1. $\sqrt{2}$ ही __ संख्या आहे. (Easy)

(A) परिमेय संख्या

(B) अपरिमेय संख्या

(C) पूर्णांक

(D) नैसर्गिक संख्या

2. $5 - \sqrt{3}$ ही __ संख्या आहे. (Easy)

(A) अपरिमेय संख्या

(B) परिमेय संख्या

(C) संयुक्त संख्या

(D) मूळ संख्या

3. खालीलपैकी परिमेय संख्या कोणती? (Easy)

(A) 5

(B) π

(C) $\sqrt{3}$

(D) $3\sqrt{3}$

4. खालीलपैकी कोणती अपरिमेय संख्या नाही? (Easy)

(A) √2

(B) √3

(C) √9

(D) √5

5. खालीलपैकी परिमेय संख्या कोणती? (MQP-2025:Easy)

(A) $\sqrt{3}$

(B) $\sqrt{5}$

(C) $\sqrt{4}$

(D) $\sqrt{7}$

6. π ही __ संख्या आहे. (Easy)

(A) अपरिमेय संख्या

(B) परिमेय संख्या

(C) मूळ संख्या

(D) संयुक्त संख्या

7. $7 \times 11 \times 13 + 13$ ही __ संख्या आहे. (Aug - 2024 : Easy)

(A) मूळ संख्या

(B) संयुक्त संख्या

(C) अपरिमेय संख्या

(D) विषम संख्या

8. 91 चे मूळ अवयव रूप कोणते? (SLP-2024 : Easy)

(A) $2 \times 13 \times 7$

(B) 13×7

(C) 91×1

(D) $13 \times 7 \times 1$

9. 1 ते 10 दरम्यान असलेल्या मूळ संख्यांची संख्या किती? (Easy)

(A) 2

(B) 3

(C) 4

(D) 12

10. कोणतीही संयुक्त संख्या __ संख्यांच्या गुणाकाराच्या रूपात व्यक्त करता येते. (Average)

(A) सम (B) विषम (C) मूळ (D) वर्ग

11. 120 चे मूळ अवयव रूप कोणते? (MQP-2019 : Easy)

(A) $2^3 \times 3^2 \times 5^1$ (B) $2^2 \times 3^1 \times 5^1$ (C) $2^3 \times 3^1 \times 5^2$ (D) $2^3 \times 3^1 \times 5^1$

12. 30 चे मूळ अवयव कोणते? (Easy)

(A) 2, 3, 5

(B) 5, 3

(C) 15, 2

(D) 6, 5

13. 2 आणि 3 चा ल.सा.वि. किती? (Easy)

(A) 2

(B) 3

(C) 5

(D) 6

14. 3 आणि 5 चा म.सा.वि. किती? (SLP-2023 :Easy)

(A) 1

(B) 3

(C) 5

(D) 15

15. कोणत्याही दोन सलग नैसर्गिक संख्यांचा म.सा.वि. किती असतो? (Easy)

(A) 0 (B) 1 (C) 2 (D) 3

16. कोणत्याही दोन मूळ संख्यांचा म.सा.वि. किती असतो? (June-2023 : Easy)

(A) 0

(B) 2

(C) 1

(D) -1

17. 'a' आणि 'b' या परस्पर prime (सह-मूळ) संख्या असतील, तर त्यांचा ल.सा.वि. __ असतो.

(A) 0

(B) a × b

(C) 1 (D) a + b

18. सर्वात लहान संयुक्त संख्या आणि सर्वात लहान मूळ संख्येचा म.सा.वि. किती?

(A) 4 (September-2020: Average)

(B) 2

(C) 1

(D) 8

19. कोणत्याही दोन धन पूर्णांकांसाठी 'a' आणि 'b' यांच्या म.सा.वि. × ल.सा.वि. चे मूल्य __ असते.

(A) a + b (April-2019 :Easy)

(B) a – b

(C) a × b

(D) a ÷ b

20. (12, 15) चा म.सा.वि. 3 आहे. तर (12, 15) चा ल.सा.वि. किती? (Average)

(A) 60 (B) 45 C) 3 (D) 90

21. $5^2 \times 2$ आणि $2^5 \times 5$ यांचा म.सा.वि. किती? (MQP-1,2024 : Easy)

(A) 2 × 5

(B) $2^5 \times 5$

(C) $5^2 \times 2^6$

(D) $2^5 \times 5^2$

22. दोन धन पूर्णांक a आणि b यांना पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे. जर x आणि y या मूळ संख्या असतील, तर (a, b) चा म.सा.वि. शोधा. (Average)

(A) xy

(B) xy^2

(C) x^3y^3

(D) x^2y^2

3. a आणि 18 यांचा ल.सा.वि. 36 आणि म.सा.वि. 2 आहे. तर a ची किंमत किती?

(A) 2 (Average

(B) 3

(C) 4 (D) 1

24. p आणि q या परस्पर prime संख्या असतील, तर p^2 आणि q^2 यांचा म.सा.वि. किती?

(A) pq (Easy)

(B) 1

(C) p + q

(D) p^2q^2

25. जर 180 = ... × ... × 5 असेल, तर x ची किंमत शोधा. (SLP-2020 : Difficult)(

A) 1 B) 2 (C) 3 (D) 4

26. 15 आणि 20 या संख्यांच्या म.सा.वि. व ल.सा.वि.चा गुणा

(A) 15 (April-2024 : Average)

(B) 20

(C) 300

(D) 35

27. 'a' ही विषम संख्या आहे आणि 'b' ही 3 ने विभाज्य संख्या आहे. जर 'a' आणि 'b' चा ल.सा.वि. 'p' असेल, तर 3a आणि 2b चा ल.सा.वि. किती? (Difficult)

(A) p^2

(B) 5p

(C) 6p

(D) 3p

28. दोन संख्या a आणि b यांचा म.सा.वि. 5 आणि ल.सा.वि. 200 आहे. तर a आणि b चा गुणाकार किती?

(A) 205 (Average)

(B) 1000

(C) 200

(D) 195

II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (१ गुण)

29. 140 चे मूळ संख्यांच्या गुणाकाराच्या रूपात रूपांतर करा.

30. अंकगणिताचा मूलभूत प्रमेय लिहा.

31. 24 आणि 36 यांचा म.सा.वि. 12 असल्यास त्यांचा ल.सा.वि. शोधा.

32. 96 चे मूळ अवयवांच्या गुणाकाराच्या रूपात रूपांतर करा.

33. 156 चे मूळ अवयवांच्या गुणाकाराच्या रूपात रूपांतर करा.

34. जर $200 = 2^m \times 5^n$ असेल, तर m आणि n ची मूल्ये शोधा.

35. 24 मी. आणि 36 मी. लांबीच्या दांड्यांना अचूकपणे मोजता येईल अशा दांड्याची जास्तीत जास्त लांबी शोधा.

36. ज्याचे केवळ 7 आणि 3 हे मूळ अवयव आहेत अशी सर्वात लहान संख्या लिहा.

37. दिलेले factor tree (अवयव वृक्ष) पाहून x आणि y ची मूल्ये शोधा.---

III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (२/३ गुण)

38. (306, 657) चा म.सा.वि. 9 असल्यास त्यांचा ल.सा.वि. शोधा.

39. $7 \times 11 \times 13 + 13$ ही संयुक्त संख्या आहे. हे विधान स्पष्ट करा.

40. (91, 26) चा ल.सा.वि. 182 असल्यास त्यांचा म.सा.वि. शोधा.

41. संयुक्त संख्या म्हणजे काय? 23 आणि 24 यांपैकी संयुक्त संख्या कोणती?

42. 438 आणि 606 या दोन्ही संख्यांना बाकी न ठेवता विभाजित करणारी सर्वात मोठी संख्या शोधा.

43. $5 + \sqrt{3}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा. **(43 ते 89 सर्व प्रश्न AVERAGE)**

44. $2 + \sqrt{5}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

45. $6 + \sqrt{2}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

46. $5-\sqrt{3}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

47. $2 + \sqrt{3}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

48. $3 + \sqrt{2}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

495 + $\sqrt{7}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

50. 5 + $\sqrt{2}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

51 4 + $\sqrt{3}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

52. 6 + $\sqrt{11}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

53. 8 + $\sqrt{5}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

54. 7 + $\sqrt{5}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

55. 2 + $\sqrt{7}$ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

56. 7 + $\sqrt{7}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

57. 2 $-\sqrt{5}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

58. 2 $-\sqrt{5}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

59. 6$-\sqrt{2}$ ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

60. (120, 135) चा म.सा.वि. 15 असल्यास त्यांचा ल.सा.वि. शोधा.

61. (88, 128) चा म.सा.वि. 8 असल्यास त्यांचा ल.सा.वि. शोधा.

62. (136, 176) चा म.सा.वि. 8 असल्यास त्यांचा ल.सा.वि. शोधा.

63. (336, 216) चा म.सा.वि. 24 असल्यास त्यांचा ल.सा.वि. शोधा.

64. (224, 336) चा ल.सा.वि. 672 असल्यास त्यांचा म.सा.वि. शोधा.

65. (112, 144) चा ल.सा.वि. 1008 असल्यास त्यांचा म.सा.वि. शोधा.

66. (96, 120) चा ल.सा.वि. 480 असल्यास त्यांचा म.सा.वि. शोधा.

67. 68 आणि 72 या संख्यांचा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. व ल.सा.वि. शोधा आणि

ल.सा.वि. × म.सा.वि. = संख्यांचा गुणाकार हे पडताळून पाहा.

68. 36 आणि 63 या संख्यांचा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. व ल.सा.वि. शोधा आणि वरील संबंध पडताळून पाहा.

69. 38 आणि 57 या संख्यांचा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. व ल.सा.वि. शोधा आणि वरील संबंध पडताळून पाहा.

70. 66 आणि 42 या संख्यांचा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. व ल.सा.वि. शोधा आणि वरील संबंध पडताळून पाहा.

71. दोन आयताकृती टेबलांची लांबी अनुक्रमे 84 सेमी आणि 126 सेमी आहे व दोन्ही टेबलांची रुंदी 42 सेमी आहे. दोन्ही टेबलांवर अचूकपणे बसू शकणाऱ्या चौकोनी काचेच्या पत्र्याची जास्तीत जास्त बाजूची लांबी शोधा. तसेच प्रत्येक टेबलासाठी आवश्यक असलेल्या काचेच्या पत्र्यांची एकूण संख्या शोधा.

72. दोन संख्यांच्या ल.सा.वि. आणि म.सा.वि.चा गुणाकार 2366 आहे आणि त्यांचा म.सा.वि. 13 आहे. तर ल.सा.वि. शोधा. त्यांपैकी एक संख्या 91 असल्यास दुसरी संख्या शोधा.

73. एका सभागृहाच्या फरशीवर चौकोनी फरशा पूर्णपणे बसवायच्या आहेत. फरशीची लांबी 112 फूट आणि रुंदी 72 फूट आहे. वापरता येणाऱ्या चौकोनी फरशीच्या तुकड्याची जास्तीत जास्त बाजूची लांबी शोधा. तसेच फरशीसाठी आवश्यक असलेल्या एकूण फरशांची संख्या शोधा.

74. दोन संख्यांच्या म.सा.वि. आणि ल.सा.वि.चा गुणाकार 2016 आहे. त्यांपैकी एक संख्या 42 असल्यास दुसरी संख्या शोधा. तसेच मूळ अवयव पद्धतीने त्या दोन संख्यांचा म.सा.वि. शोधा.

75. $2^m \times 3^2$, $3^n \times 2^2$ आणि $3^3 \times 2$ यांचा ल.सा.वि. आणि म.सा.वि. अनुक्रमे $3^4 \times 2^3$ आणि $3^y \times 2^x$ असल्यास m, n, x आणि y ची मूल्ये शोधा.

76. दोन विद्यार्थी A आणि B अनुक्रमे 24 आणि 60 गुलाब वापरून हार तयार करतात. काही हार तयार केल्यानंतर दोघांनी वापरलेल्या फुलांची संख्या समान होते. दोघांनी समान प्रमाणात वापरलेल्या गुलाबांची किमान संख्या शोधा आणि त्यांनी असे किती हार तयार केले आहेत ते शोधा.

77. क्रीडांगणाभोवती गोलाकार मार्ग आहे. A ला मैदानाची एक फेरी पूर्ण करण्यासाठी 18 मिनिटे लागतात, तर B ला 24 मिनिटे लागतात. दोघेही एकाच ठिकाणाहून, एकाच वेळी आणि एकाच दिशेने निघाले, तर ते पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी किती मिनिटांनी एकत्र येतील?

78. अंकगणिताच्या मूलभूत प्रमेयानुसार, जर ... असेल, तर x, y आणि z ची मूल्ये शोधा.

79. आयताकृती मैदानाची लांबी 147 मी. आणि रुंदी 56 मी. आहे. लांबी व रुंदी दोन्ही अचूकपणे मोजण्यासाठी वापरता येणाऱ्या दांड्याची जास्तीत जास्त लांबी शोधा. मैदानाची लांबी मोजण्यासाठी हा दांडा किती वेळा वापरावा लागेल?

80. एका मिठाई विक्रेत्याकडे 420 काजू बर्फी आणि 130 बदाम बर्फी आहेत. तिला त्या अशा प्रकारे रचायच्या आहेत की प्रत्येक ढिगात बर्फींची संख्या समान असेल आणि ट्रेवर कमीत कमी जागा व्यापली जाईल. या उद्देशासाठी प्रत्येक ढिगात किती बर्फी ठेवता येतील?

81. $\sqrt{2}$ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

82. $\sqrt{3}$ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

83. $\sqrt{5}$ही अपरिमेय संख्या आहे हे सिद्ध करा.

84. 510 आणि 92 या संख्यांचा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. व ल.सा.वि. शोधा आणि

ल.सा.वि. × म.सा.वि. = संख्यांचा गुणाकार हे पडताळून पाहा.

85. 336 आणि 54 या पूर्णांकांचा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. व ल.सा.वि. शोधा आणि

ल.सा.वि. × म.सा.वि. = पूर्णांकांचा गुणाकार हे पडताळून पाहा.

86. 26 आणि 91 यांचा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. व ल.सा.वि. शोधा आणि

ल.सा.वि. × म.सा.वि. = संख्यांचा गुणाकार हे पडताळून पाहा.

87. 135 आणि 75 चा मूळ अवयव पद्धतीने म.सा.वि. शोधा आणि त्यानंतर HCF(135, 75) आणि 20 यांचा ल.सा.वि. शोधा.

88. 12, 15 आणि 21 यांचा मूळ अवयव पद्धतीने ल.सा.वि. व म.सा.वि. शोधा.

89. 6, 72 आणि 120 यांचा मूळ अवयव पद्धतीने ल.सा.वि. व म.सा.वि. शोधा.

90. परेडमध्ये 616 सदस्यांचे सैन्यदल 32 सदस्यांच्या सैन्य बँडच्या मागे चालणार आहे. दोन्ही गटांनी समान संख्येच्या स्तंभांमध्ये चालायचे आहे. ते ज्या जास्तीत जास्त स्तंभांमध्ये चालू शकतील त्यांची संख्या शोधा. तसेच प्रत्येक गटातील ओळींची संख्या शोधा. (difficult)

अध्याय २ : बहुपदी

अध्ययन निष्पत्ती

4. बहुपदीचे प्रकार व घातांक ओळखणे, बहुपदीचे प्रमाणित रूपात रूपांतर करणे तसेच बहुपदीची कोटी (degree) आणि शून्ये (zeroes) यांच्यातील संबंध ओळखणे.

5. बहुपदीची शून्ये शोधण्यासाठी बीजगणितीय व आलेखीय पद्धतींमधील संबंध विकसित करणे.

6. बहुपदीची शून्ये आणि गुणांक यांच्यातील संबंध शोधणे आणि शून्ये / शून्यांची बेरीज / शून्यांचा गुणाकार दिला असता द्विघाती बहुपदी तयार करणे.

I. खालील प्रत्येक प्रश्न / अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा व त्याच्या अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

1. बहुपदी p(x)= $x^2 - 3x + 4x^3 - 6$ ची कोटी किती? [MQP 2018, Easy

(A) 2 (B) 1 (C) 3 (D) 6

2. रेषीय बहुपदीची कोटी किती असते? [MQP 2019,Easy]

(A) 0 (B) 1 (C) 2 (D)

3. बहुपदी p(x) = $2x^3$ + 3x -11 + 6 ची कोटी किती? [Easy]

(A) 2 (B) 6 (C) 3 (D) 4

4. द्विघाती बहुपदीची कोटी किती असते? ? [Easy

(A) 4 (B) 1 (C) 3 (D) 2

5. घन बहुपदीची कोटी किती असते? [MARCH 2020 Easy]

(A) 4 (B) 1 (C) 3 (D) 2

6. द्विघाती बहुपदीची जास्तीत जास्त किती शून्ये असू शकतात? [SLP 2024, Easy]

(A) 4 (B) 1 (C) 2 (D) 3

7. द्विघाती बहुपदी $f(x) = x^2 - 9x + 20$ साठी $f(0)$ ची किंमत किती? [Easy]

(A) 20 (B) 11 (C) -20 (D) 29

8. बहुपदी $p(x) = x^2 - 1$ साठी $p(2)$ची किंमत किती? [Easy]

(A) 2 (B) 3 (C) 0 (D) 1

9. आकृतीमध्ये आलेखाद्वारे दर्शविलेल्या $y = p(x)$ या बहुपदीची शून्यांची संख्या किती?

(A) 4 (B) 3 (C) 2 (D) 7 [JUNE 2019, Easy]



10. आकृतीमध्ये $p(x)$ हा बहुपदीचा आलेख दर्शविला आहे. बहुपदीची शून्ये किती आहेत? [Easy]

(A) 4 (B) 2 (C) 3 (D) 1



11. आकृतीमध्ये $p(x)$ या बहुपदीची शून्यांची संख्या किती आहे?

(A) 3 (B) 5 (C) 4 (D) 2



12. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज -2 आणि गुणाकार 8 आहे, ती बहुपदी कोणती?

A) $x^2 + 2x + 8$ B) $x^2 - 2x - 8$ C) $x^2 + 2x - 8$ D) $x^2 - 2x + 8$

13. आकृतीमध्ये $p(x)$ या बहुपदीची शून्यांची संख्या किती आहे?

(A) 1 (B) 3 (C) 2 (D) 4

14. आकृतीमध्ये = p(x)या बहुपदीची शून्ये 

कोणती आहेत?



(A) 1 आणि -4

(B) -3 आणि -4

(C) -2 आणि -4

(D) -1 आणि -4

15. जर α आणि β ही $p(x) = ax^2 + bx + c$ या बहुपदीची शून्ये असतील, तर α x β, ची किंमत किती?

A) $\frac{b}{a}$ B) $\frac{-b}{a}$ C) $\frac{c}{a}$ D) $\frac{-c}{a}$ [APRIL 2024

16. जर α आणि β ही $p(x) = ax^2 + bx + c$ या बहुपदीची शून्ये असतील, तर α + β ची किंमत किती?

A) $\frac{b}{a}$ B) $\frac{-b}{a}$ C) $\frac{c}{a}$ D) $\frac{-c}{a}$ [Easy]

17. बहुपदी $p(x) = x^2 - x + k$ च्या शून्यांपैकी एक शून्य 2 असल्यास k ची किंमत किती?

(A) 2 (B) -2 (C) -6 (D) 6 [JUNE 2019, Difficult]

18. बहुपदी $p(x) = kx^2 + 2x + 3k$ च्या शून्यांची बेरीज ही त्याच शून्यांच्या गुणाकाराइतकी असल्यास k ची किंमत शोधा.

A) $\frac{2}{3}$ B) $\frac{-2}{3}$ C) $\frac{3}{4}$ D) $\frac{-3}{4}$ [Average]

19. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 4 आणि गुणाकार 5 आहे, ती बहुपदी कोणती?

A) $p(x) = x^2 - 4x - 5$ B) $p(x) = x^2 + 4x - 5$ C) $p(x) = x^2 - 5x + 4$ D) $p(x) = x^2 - 4x + 5$
[,MQP2023,Easy]

20. बहुपदी $p(x) = x^2 - 2x - 8$च्या शून्यांची बेरीज किती?

(A) -8 (B) 2 (C) -2 (D) 8 [MQP 2024, Average]

21. बहुपदी P(x) चा आलेख (-3,0), (-1,-5), (0,-6) आणि (2,0) या बिंदूंमधून जात असल्यास, त्या द्विघाती बहुपदीची शून्ये कोणती?

(A) -3 आणि -6 [MQP 2024: Difficult]

(B) 0 आणि -3

(C) -1 आणि -5

(D) -3 आणि 2

II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (१ गुण)

22. घन बहुपदीची जास्तीत जास्त किती शून्ये असू शकतात?

23. दिलेल्या आलेखावरून बहुपदी p(x) ची शून्यांची संख्या शोधा.



24. दिलेल्या आलेखावरून बहुपदी p(x) ची शून्यांची संख्या शोधा. [JUNE 2020, APRIL 2023, Easy]

25. बहुपदी $p(x) = x^3 + 2x^2 - 5x^4 - 6$ ची कोटी लिहा.

[APRIL 2016,Easy]

26. बहुपदी $f(x) = x^2 - 3x^3 + 2$ ची कोटी लिहा.

[APRIL 2018,Easy]

27. बहुपदी $f(x) = 2x^2 - x^3 + 5$ ची कोटी लिहा. [APRIL 2019, Easy]

28. बहुपदी $p(x) = 3x^3 - 4x^2 + 5x^4 - 3x + 4$ ची कोटी लिहा. [APRIL 2023, Easy]

29. बहुपदी $p(x) = x(x^2 + 2x) + 3x - 5$ ची कोटी लिहा. [Average]

30. बहुपदी $g(p) = 7p^4 - 2p^3 + 3p^2 + p - 3$ ची कोटी लिहा. [MQP 2024, Easy]

31. बहुपदी $P(x) = x^2 - 5x + 6$ च्या शून्यांची बेरीज शोधा. [JUNE 2023, Easy]

32. बहुपदी $P(x) = 2x^2 - 9x + 10$ च्या शून्यांचा गुणाकार शोधा. [SLP 2020 , Easy]

33. बहुपदी $P(x) = x^2 + 7x + 10$ च्या शून्यांची बेरीज शोधा. [March 2024,Easy]

34. बहुपदी $f(x) = 2x^2 - 3x + k$ च्या शून्यांचा गुणाकार 3 असल्यास 'k' ची किंमत शोधा. [Average]

35. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज -3 आणि गुणाकार 2 आहे, ती बहुपदी लिहा.

[SLP 2019, Easy]

36. बहुपदी $p(x) = x^2 - 3$ ची शून्ये शोधा. [Easy]

37. बहुपदी $p(x) = x^2 - 25$ ची शून्ये शोधा. [Easy]

38. जर $P(x) = 2x^3 + 3x^2 - 11x + 6$, तर p(1) ची किंमत शोधा. [LO – 4, Average]

39. दिलेल्या आलेखातील $y = p(x)$ या बहुपदीची शून्ये लिहा. [MARCH 2025, Easy]

40. ज्यांची शून्ये α आणि β आहेत अशी द्विघाती बहुपदी $p(x)$ लिहा.

-III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (२ गुण)

41. रेषीय बहुपदी आणि द्विघाती बहुपदीचे प्रमाणित रूप लिहा. [MQP 2020,Easy]
42. बहुपदी P(x) = 6x ^{2} −3−7x ची शून्ये शोधा. [MQP 2019, Average]

43. बहुपदी P(x) = $4x^2 - 4x - 3$ची शून्ये शोधा. [APRIL 2019, Average]

44. बहुपदी p(x) = $ax^2 + bx$ + c च्या शून्यांची बेरीज -3 आणि शून्यांचा गुणाकार 2 असल्यास, b + c = 5a हे सिद्ध करा. [Difficult]
45. जर αआणि ही P(x) = x^2 - 4x + 5 या बहुपदीची दोन शून्ये असतील, तर $\alpha^2 + \beta^2$. राशीची किंमत शोधा. [Difficult]
46. जर αआणि β ही P(x) = x^2 +3x + 1 या बहुपदीची दोन शून्ये असतील, तर $\frac{1}{\alpha} + \frac{1}{\beta}$ राशीची किंमत शोधा. [Difficult]
47. जर ही P(x) = x^2 +3x + 1 या बहुपदीची दोन शून्ये असतील, तर $\alpha^2\beta + \alpha\beta^2$ राशीची किंमत शोधा.

[Difficult]

48. बहुपदी P(x) = $2x^2 - 6x$ + k च्या एका शून्याची किंमत दुसऱ्या शून्याच्या दुप्पट आहे. 'k' ची किंमत शोधा. [SEPT 2020, Average]
49. बहुपदी P(x) = $ax^2 + bx - 4$ च्या शून्यांची बेरीज $\frac{1}{4}$ आणि गुणाकार -1 आहे. a आणि b ची मूल्ये शोधा. [Average]

50. बहुपदी P(x) = $x^2 - 5x - 6$ ची शून्ये शोधा. [Average]

51. ज्यांची शून्ये $\sqrt{3}$ आणि $-\sqrt{3}$आहेत अशी बहुपदी शोधा. (Difficult)

IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(३ गुण)

52. द्विघाती बहुपदी p(x) = x^2 - 2x – 8 ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. [Difficult]

53. द्विघाती बहुपदी p(x) = x^2 + 7x + 10 ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. [JUNE 2023, APRIL 2025,Difficult]
54. द्विघाती बहुपदी $p(x) = 6x^2 - 7x - 3$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (MQP 2026,Avearge)

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

55. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 + 6x + 8$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (SLP 2026 ,Average)

56. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 + 6x + 5$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Average)

57. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 + 3x + 2$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Average)

58. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 + x - 12$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Average)

59. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 - 6x + 9$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Average)

60. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 - 2x - 15$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Average)

61. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 - 5x - 14$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Average)

62. द्विघाती बहुपदी $p(x) = x^2 - 2x + 1$ ची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Average)

63. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज -3 आणि गुणाकार 2 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. [MARCH 2024,Difficult]

64. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 7 आणि गुणाकार 12 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा [JUNE 2024,Difficult].

65. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 2 आणि गुणाकार 8 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. (Avearge)

66. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 4 आणि गुणाकार 4 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. (Avearge)

67. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 6 आणि गुणाकार 8 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. (Avearge)

68. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 3 आणि गुणाकार 10 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. (Avearge)

69. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 2 आणि गुणाकार 15 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. (Avearge)

70. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 5 आणि गुणाकार -6 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. (Avearge)

71. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज 9 आणि गुणाकार 14 आहे, ती बहुपदी लिहा आणि त्या बहुपदीची शून्ये शोधा. (Avearge)

72. आलेखामध्ये दर्शविलेली द्विघाती बहुपदी शोधा. शून्ये आणि गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Difficult)



73. ज्या द्विघाती बहुपदीच्या शून्यांची बेरीज -6 आणि गुणाकार 8 आहे, ती बहुपदी लिहा. त्या बहुपदीची शून्ये शोधा आणि शून्ये व गुणांक यांच्यातील संबंध पडताळून पाहा. (Difficult)

74. जर αआणि ही $p(x) = x^2 + 3x + 1$ या द्विघाती बहुपदीची शून्ये असतील, तर

i) $\frac{1}{\alpha} + \frac{1}{\beta}$ (ii) $\alpha^2\beta + \alpha\beta^2$ या राशींच्या किंमती शोधा. (MQP 2026, Difficult)

75. जर αआणि β ही $p(x) = x^2 + 3x + 2$ या बहुपदीची दोन शून्ये असतील, तर दिलेल्या राशीची किंमत शोधा. (MQP 2026, Difficult)

76. जर αआणि β ही $p(x) = x^2 + 3x + 2$ या बहुपदीची दोन शून्ये असतील, तर $\alpha^3\beta + \alpha\beta^3$ राशीची किंमत शोधा. (MQP 2026, Difficult)

77. बहुपदी $P(x) = 2x^2 - 8x + (k+1)$ च्या एका शून्याची किंमत दुसऱ्या शून्याच्या सातपट आहे. 'k' ची किंमत शोधा. (MQP 2026,Difficult)

प्रकरण -3 दोन चलपदाच्या रेषीय समीकरणाची जोडी

I. खालील प्रत्येक प्रश्न/अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत.

योग्य पर्याय निवडून अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा.

(१ गुण)

1. $a_1x+b_1y+c_1=0$ आणि $a_2x+b_2y+c_2=0$ या दोन रेषीय समीकरणांच्या जोडीने दर्शविलेल्या रेषा एकरूप (Coincident) असल्यास, खालीलपैकी योग्य संबंध कोणता?

(जून-2025, सोपे)

A) $\frac{a_1}{a_2}=\frac{b_1}{b_2}=\frac{c_1}{c_2}$ B) $\frac{a_1}{a_2}\neq\frac{b_1}{b_2}\neq\frac{c_1}{c_2}$ C) $\frac{a_1}{a_2}=\frac{b_1}{b_2}\neq\frac{c_1}{c_2}$ D) $\frac{a_1}{a_2}\neq\frac{b_1}{b_2}=\frac{c_1}{c_2}$

2. $a_1x+b_1y+c_1=0$ आणि $a_2x+b_2y+c_2=0$ या दोन रेषीय समीकरणांच्या जोडीने दर्शविलेल्या रेषा छेदणाऱ्या असल्यास, खालीलपैकी योग्य संबंध कोणता?

(जुलै-2021, सोपे)

A) $\frac{a_1}{a_2}=\frac{b_1}{b_2}\neq\frac{c_1}{c_2}$ B) $\frac{a_1}{a_2}=\frac{b_1}{b_2}=\frac{c_1}{c_2}$ C) $\frac{a_1}{a_2}\neq\frac{b_1}{b_2}$ D) $\frac{a_1}{b_2}=\frac{b_1}{a_2}$

3. दोन रेषीय समीकरणांच्या जोडीमध्ये $a_1x+b_1y+c_1=0$ आणि $a_2x+b_2y+c_2=0$ जर $\frac{a_1}{a_2}\neq\frac{b_1}{b_2}$, तर –

A) समीकरणांना कोणतेही उत्तर नाही.

B) समीकरणांना एकमेव उत्तर आहे.

C) समीकरणांना तीन उत्तरे आहेत. D) समीकरणांना अनंत उत्तरे आहेत.

4. दोन रेषीय समीकरणांच्या जोडीला एकमेव उत्तर असल्यास, खालीलपैकी योग्य संबंध कोणता?

A) $\frac{a_1}{a_2}\neq\frac{b_1}{b_2}$ B) $\frac{a_1}{a_2}=\frac{b_1}{b_2}=\frac{c_1}{c_2}$ C) $\frac{a_1}{a_2}=\frac{b_1}{b_2}$ D) $\frac{a_1}{a_2}=\frac{b_1}{b_2}\neq\frac{c_1}{c_2}$

5. $2x + 3y - 9 = 0$ आणि $4x + 6y - 18 = 0$ या समीकरणांनी दर्शविलेल्या रेषा कोणत्या आहेत?

A) छेदणाऱ्या रेषा

B) एकमेकांना लंब रेषा

C) समांतर रेषा

D) एकरूप रेषा

(एप्रिल-2024, सरासरी)

6. $x + 2y - 4 = 0$ आणि $2x + 4y - 12 = 0$ या समीकरणांनी दर्शविलेल्या रेषा कोणत्या आहेत?

A) छेदणाऱ्या रेषा

B) समांतर रेषा

C) एकमेकांना लंब रेषा

D) एकरूप रेषा

(सप्टेंबर-2020, सरासरी)

7. $2x - 5y + 4 = 0$ आणि $2x + y - 8 = 0$ या रेषीय समीकरणांच्या जोडीला –

A) नेमकी दोन उत्तरे आहेत.

B) अनंत उत्तरे आहेत.

C) एकमेव उत्तर आहे.

D) कोणतेही उत्तर नाही.

8. $x - 2y = 0$ आणि $3x + 4y - 20 = 0$ या रेषीय समीकरणांच्या जोडीने दर्शविलेल्या रेषा –

A) छेदणाऱ्या रेषा B) एकमेकांना लंब रेषा C) समांतर रेषा D) एकरूप रेषा (जुलै-2021, सरासरी)

9. $x + 2y - 4 = 0$ आणि $2x + 4y - 12 = 0$ ही समीकरणे आलेखावर दर्शविल्यास त्या –

A) छेदणाऱ्या रेषा

B) एकमेकांना लंब रेषा

C) समांतर रेषा

D) एकरूप रेषा (एप्रिल-2024, सरासरी)

10. $x - y = 8$ आणि $3x - 3y = 16$ या समीकरणांनी दर्शविलेल्या रेषा –

A) छेदणाऱ्या रेषा

B) एकमेकांना लंब रेषा

C) समांतर रेषा

D) एकरूप रेषा (जून-2022, सरासरी)

11. रेषीय समीकरणांची एखादी जोडी विसंगत (Inconsistent) असल्यास, त्याद्वारे दर्शविलेल्या रेषा परस्पर

A) छेदणाऱ्या

B) एकमेकांना लंब

C) समांतर

D) एकरूप

12. $x + 2y = 3$ आणि $2x + 4y = k$ या समीकरणांनी दर्शविलेल्या रेषा एकरूप असल्यास 'k' ची किंमत किती?

A) 3

B) 6

C) -3

D) -6 (ऑगस्ट-2024, कठीण)

13. $3x + 2ky = 2$ आणि $2x + 5y + 1 = 0$ या समीकरणांनी दर्शविलेल्या रेषा समांतर असल्यास 'k' ची किंमत किती?

A) -5/4 B) 2/5 C) 15/4 D) 3/2

14. खालीलपैकी कोणत्या रेषीय समीकरणांच्या जोडीने एकरूप रेषा दर्शविल्या आहेत?

A) $x - 2y = 0$

$3x + 4y = 20$

B) $2x + 3y = 9$

$4x + 6y = 18$

C) x + 2y = 4

2x + 4y = 12

D) x + y = 8

x - y = 4

15. खालीलपैकी रेषीय समीकरणांच्या जोडीने दर्शविलेल्या रेषांबाबत चुकीचे विधान कोणते?

A) रेषा समांतर असल्यास समीकरणांना कोणतेही उत्तर नसते.

B) रेषा एकमेकांना लंब असल्यास समीकरणांना कोणतेही उत्तर नसते.

C) रेषा एकरूप असल्यास समीकरणांना अनंत उत्तरे असतात.

D) रेषा छेदणाऱ्या असल्यास समीकरणांना एकमेव उत्तर असते.

16. $2x + 3y = 16$ हे समीकरण सिद्ध करणाऱ्या x आणि y च्या किंमती कोणत्या?

A) x = 5, y = 2

B) x = 2, y = 5

C) x = -5, y = -2

D) x = -5, y = 2

II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(१ गुण)

17. 'x' आणि 'y' ही चल असलेल्या दोन रेषीय समीकरणांच्या जोडीचे प्रमाणित रूप लिहा.

18. दोन चलांतील रेषीय समीकरणांची जोडी विसंगत (inconsistent) असल्यास तिला किती उत्तरे असतात?

19. $a_1x+b_1y+c_1=0$ आणि $a_2x+b_2y+c_2=0$ या समीकरणांच्या जोडीमध्ये $\frac{a_1}{a_2} \neq \frac{b_1}{b_2}$? असल्यास तिला किती उत्तरे असतात?

20. दोन चलांतील रेषीय समीकरणांच्या जोडीने दर्शविलेल्या रेषा एकरूप असल्यास तिला किती उत्तरे असतात?

21. लांबी 'l' एकक आणि रुंदी 'b' एकक असलेल्या आयताची परिमिती 32 मीटर आहे. या विधानासाठी दोन चलांतील रेषीय समीकरण तयार करा.

22. एका वर्गात, "मुलांची संख्या (x) ही मुलींच्या संख्येच्या (y) दुप्पटपेक्षा 1 ने जास्त आहे." या विधानासाठी दोन चलांतील रेषीय समीकरण तयार करा.

23. $x + 2y - 4 = 0$ आणि $ax + by - 12 = 0$ या समीकरणांनी दर्शविलेल्या रेषा एकरूप असल्यास 'a' आणि 'b' यांच्या किंमती शोधा.

24. $4x + py + 8 = 0$ आणि $4x + 4y + 2 = 0$ या समीकरणांनी दर्शविलेल्या रेषा समांतर असल्यास 'p' ची किंमत शोधा.

25. $x + 2y - 4 = 0$ आणि $3x + 2y - 5 = 0$ या रेषीय समीकरणांच्या जोडीला किती उत्तरे आहेत?

26. $2x + 3y - 9 = 0$ आणि $4x + 6y - 18 = 0$ या रेषीय समीकरणांच्या जोडीला किती उत्तरे आहेत?

27. दोन चलांतील रेषीय समीकरणांच्या जोडीने दर्शविलेल्या रेषा छेदणाऱ्या असल्यास त्या जोडीला किती उत्तरे असतात?

28. $2x - 3y + 4 = 0$ आणि $3x + 5y + 8 = 0$ या रेषीय समीकरणांच्या जोडीला किती उत्तरे आहेत?

29. $2x + 3y - 9 = 0$ आणि $3x - 2y + 6 = 0$ या रेषीय समीकरणांच्या जोडीला किती उत्तरे आहेत?

30. "पाच वर्षांपूर्वी नूरीचे वय (x) सोनूच्या वयाच्या (y) तिप्पट होते." या विधानासाठी दोन चलांतील रेषीय समीकरणाचे प्रमाणित रूप लिहा.

31. खाली दिलेला दोन चलांतील रेषीय समीकरणांच्या जोडीचा आलेख आहे. या जोडीला किती उत्तरे आहेत?



III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (२ गुण)

32. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 10$

$x - y = 2$

33. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$3x - y = 15$

$2x - y = 5$

34. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 8$

$x - y = 1$

35. पर्यायी पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + y = 14$

$x - y = 4$

36. पर्यायी पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + 2y = 8$

$x - y + 1 = 0$

37. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 8$

$3x - y = 7$

38. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 10$

$x + y = 6$

39. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$3x + y = 9$

$x + y = 5$

40. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा $x + 2y = 6$, $x + y = 5$

41. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 2$

$x + y = 4$

42. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + 3y = 10$

$x + y = 6$

43. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x - y = 8$

$x + y = 7$

44. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$3x - y = 4$

$x + y = 8$

45. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$4x + y = 13$

$x - y = 2$

46. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + y = 13$

$x - y = 1$

47. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + 4y = 14$

$x - y = 1$

48. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x - y = 5$

$x - y = 1$

49. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$5x - y = 14$, $x - y = 2$

50. पर्यायी पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 10$

$x + y = 6$

51. पर्यायी पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$3x + y = 10$

$x + y = 4$

52. पर्यायी पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + 2y = 13$

$x - y = 2$

53. दोन धन पूर्णांकांची बेरीज आणि वजाबाकी अनुक्रमे 10 आणि 2 आहे. ते पूर्णांक शोधा.

54. दोन धन पूर्णांकांची बेरीज 15 आहे. एक संख्या दुसऱ्या संख्येपेक्षा 1 ने जास्त असल्यास ते पूर्णांक शोधा.

55. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$3x + 2y = 5$

$x - y = 1$

56. लोप पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + 5y = 7$

$5x + 2y = 7$

IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (३ गुण)

57. एखादा अपूर्णांक त्याच्या अंश आणि छेदामध्ये 2 मिळवल्यास 9/11 होतो; परंतु अंश आणि छेदामध्ये 3 मिळवल्यास तो 5/6 होतो. तो अपूर्णांक शोधा.

58. 10 वर्षांनंतर x चे वय y च्या वयाच्या दुप्पट असेल. 10 वर्षांपूर्वी x चे वय y च्या वयाच्या सहापट होते. त्यांची वर्तमान वये शोधा.

59. रितूला प्रवाहाच्या दिशेने 20 किमी अंतर पार करण्यासाठी 2 तास आणि प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने 4 किमी अंतर पार करण्यासाठी 2 तास लागतात. स्थिर पाण्यातील रितूचा वेग आणि प्रवाहाचा वेग निश्चित करा.

60. दोन व्यक्तींच्या मासिक उत्पन्नाचे गुणोत्तर 9 : 7 आणि त्यांच्या मासिक खर्चाचे गुणोत्तर 4 : 3 आहे. महिन्याच्या शेवटी दोघेही प्रत्येकी ₹2000 बचत करत असतील, तर त्यांचे मासिक उत्पन्न शोधा.

61. पाच वर्षांनंतर 'A' चे वय त्याच्या मुलाच्या वयाच्या तिप्पट असेल. पाच वर्षांपूर्वी 'A' चे वय त्याच्या मुलाच्या वयाच्या सातपट होते. त्यांची वर्तमान वये शोधा.

V. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (४ गुण)

62. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 8$

$x - y = 1$

63. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 8$

$x + y = 6$

64. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + 2y = 6$

$x + y = 5$

65. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + 3y = 11$

$x + y = 5$

66. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 13$

$x + y = 8$

67. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + 2y = 10$

$x + y = 8$

68. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$2x + y = 4$

$x + y = 3$

69. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.

$x + y = 5$

$2x + y = 8$

70. आलेखीय पद्धतीने खालील रेषीय समीकरणांची जोडी सोडवा.$x + 2y = 14$,$x + y = 8$

प्रकरण -4 वर्गसमीकरणे

खालील प्रत्येक प्रश्न/अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत.

योग्य पर्याय निवडून अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

1. वर्ग समीकरणाचे प्रमाणित रूप कोणते?

A) $ax^2 - bx + c = 0$

B) $ax^2 + bx + c = 0$

C) $ax^2 - bx - c = 0$

D) $ax^2 + bx - c = 0$

2. खालीलपैकी वर्ग समीकरण कोणते?

A) $x^3 - 6x$

B) $p(x) = x^2 + 7x$

C) $3x - 9 = 0$

D) $x^2 + 3x + 4 = 0$

3. खालीलपैकी वर्ग समीकरण कोणते?

A) $x^2 - 3x + 2 = 0$ B) $2x + 3 = 0$ C) $x^3 - 5x + 6 = 0$ D) $2x^2 + 7x + 1 = 0$

4. $5x^2 = 2(2x + 3)$ हे वर्ग समीकरण प्रमाणित रूपात लिहिल्यास

स्थिर पदाची किंमत किती?

A) 5

B) 6

C) 4

D) -6

5. $x(x + 2) = 6$ हे कोणत्या प्रकारचे समीकरण आहे?

A) रेषीय समीकरण

B) वर्ग समीकरण

C) घन बहुपदी

D) वर्ग बहुपदी

6. $2x^2 = 3x - 5$ या वर्ग समीकरणाचे प्रमाणित रूप कोणते?

A) $x^2 - x + 5 = 0$

B) $2x^2 + 3x - 5 = 0$

C) $2x^2 - 3x - 5 = 0$

D) $2x^2 - 3x + 5 = 0$

7. दोन सलग धन पूर्णांकांचा गुणाकार 30 आहे.

या विधानासाठी समीकरण कोणते?

A) $x + 2 = 30$

B) $x - 2 = 30$

C) $x - 3 = 30$

D) $x(x + 1) = 30$

8. $ax^2 + bx + c = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक (Discriminant) कोणता?

A) $b^2 - 4ac$

B) $c^2 - 4ab$

C) $b^2 + 4ac$ D) $a^2 + 4ab$

9. $x^2 + 4x + 4 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक किती?

A) 0

B) 12

C) 16

D) 48

10. वर्ग समीकरणाचा विवेचक शून्य असल्यास त्याच्या मुळांचे स्वरूप कसे असते?

A) भिन्न, वास्तविक आणि अपरिमेय

B) वास्तविक आणि समान

C) भिन्न, वास्तविक आणि परिमेय

D) वास्तविक मुळे नाहीत

11. $x^2 - 2x + 1 = 0$ या वर्ग समीकरणाच्या मुळांचे स्वरूप कोणते?

A) दोन समान वास्तविक मुळे

B) दोन भिन्न, वास्तविक आणि परिमेय मुळे

C) दोन भिन्न, वास्तविक आणि अपरिमेय मुळे

D) वास्तविक मुळे नाहीत

12. $x^2 + 6x + k = 0$ या वर्ग समीकरणाची मुळे वास्तविक आणि समान असल्यास 'k' ची किंमत किती?

A) 9

B) -9

C) 8

D) 5

13. $ax^2 + bx + c = 0$ या वर्ग समीकरणाची मुळे वास्तविक आणि भिन्न असल्यास –

A) $b^2 - 4ac > 0$ B) $b^2 - 4ac = 0$ C) $b^2 - 4ac < 0$ D) $b^2 - 4ac > 0$

14. $(x - 3)(x + 2) = 0$ या समीकरणाची मुळे कोणती?

A) -3, 2

B) 3, -2

C) -3, -2

D) 3, 2

15. $(2x - 3)(x + 5) = 0$ या वर्ग समीकरणाचे एक मूळ -5 असल्यास,

दुसरे मूळ किती?

A) 5 B) 3/2 C) 2/3 D) -3/2

16. $2x^2 + ax + 6 = 0$ या वर्ग समीकरणाचे एक मूळ 2 असल्यास 'a' ची किंमत किती?

A) 7

B) 7/2

C) -7

D) -7/2

II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (१ गुण)

17. $x(2 + x) = 3$ हे समीकरण वर्ग समीकरणाच्या प्रमाणित रूपात लिहा.

18. दिलेले समीकरण वर्ग समीकरणाच्या प्रमाणित रूपात लिहा.

$$\frac{x+1}{2} = \frac{1}{x}$$

19. $px^2 + qx - r = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक लिहा.

20. $2x^2 - 4x + 3 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा.

21. $(x + 4)(x + 3) = 0$ या वर्ग समीकरणाचे एक मूळ -4 असल्यास

दुसरे मूळ शोधा.

22. $(x - 1)(x + 3) = 0$ या वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

23. दिलेल्या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा $x^2 - 5x + 1 = 0$

24. $x^2 - 9 = 0$ या वर्ग समीकरणाच्या मुळांचे स्वरूप लिहा.

25. $2m^2 = 2 - m$ हे समीकरण वर्ग समीकरणाच्या प्रमाणित रूपात लिहा.

26. $x^2 - x = 0$ या वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

27. $x(x + 2) = 0$ या वर्ग समीकरणाची मुळे लिहा.

28. $ax^2 + bx + c = 0$ या वर्ग समीकरणाची मुळे लिहा.

29. "दोन सलग धन पूर्णांकांचा गुणाकार 306 आहे."

हे विधान वर्ग समीकरणाच्या प्रमाणित रूपात लिहा.

III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (२ गुण)

30. अवयव पद्धतीने खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$x^2 + 7x + 12 = 0$

31. खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$x^2 + 4x - 60 = 0$

32. अवयव पद्धतीने खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$x^2 + 3x + 2 = 0$

33. खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$2x^2 + x - 6 = 0$

34. खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$x^2 + 8x + 12 = 0$

35. अवयव पद्धतीने खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$3x^2 - 6x + 3 = 0$

36. अवयव पद्धतीने खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$x^2 - 3x - 10 = 0$

37. अवयव पद्धतीने वर्ग समीकरणाची मुळे शोधा. $x^2 + 6x - 8 = 0$

38. अवयव पद्धतीने खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$2x^2 + 4x + 2 = 0$

39. अवयव पद्धतीने खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$x^2 + 5x + 6 = 0$

40. अवयव पद्धतीने खालील वर्ग समीकरणाची मुळे शोधा.

$x^2 + 5x + 4 = 0$

41. $2x^2 + 3x - 7 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा.

42. $x^2 + 5x + 6 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा.

43. $2x^2 + 7x + 1 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा.

44. $3x^2 + 5x - 3 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा.

45. $x^2 + 4x - 7 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा.

46. $2x^2 + 8x + 8 = 0$ या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा.

47. दिलेले समीकरण वर्ग समीकरणाच्या प्रमाणित रूपात लिहा.

$(x + 2)^3 = x^3 - 4$

48. $(2x + 3)x = x^2 + 1$ हे समीकरण वर्ग समीकरणाच्या प्रमाणित रूपात लिहा.

49. दिलेल्या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा. $2x^2 - 5x + 3 = 0$

50. दिलेल्या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा. $4x^2 - 4x + 1 = 0$

51. दिलेल्या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा. $2x^2 - 6x + 3 = 0$

52. दिलेल्या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा. $x^2 + 4x + 4 = 0$

53. दिलेल्या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि मुळांचे स्वरूप लिहा. $2x^2 - 5x - 1 = 0$

54. वर्ग समीकरणाची मुळे वास्तविक आणि भिन्न आहेत हे सिद्ध करा.

$x^2 + ax - 4 = 0$

55. कोणत्या 'k' च्या किंमतीसाठी दिलेल्या समीकरणाची मुळे समान असतील? $kx^2 + 6x + 1 = 0$

56. दिलेल्या वर्ग समीकरणाला दोन समान वास्तविक मुळे असल्यास

समीकरण शोधा. $x^2 + bx + 9 = 0$

57. कोणत्या 'k' च्या किंमतीसाठी दिलेल्या वर्ग समीकरणाला

समान वास्तविक मुळे असतील? $2x^2 + kx + 3 = 0$

58. दिलेल्या वर्ग समीकरणाचा विवेचक शोधा आणि त्यावरून मुळांचे स्वरूप लिहा. $x^2 + 4x + 5 = 0$

59. अवयव पद्धतीने दिलेल्या समीकरणाची मुळे शोधा. $2x^2 + kx + 3 = 0$

60. अवयव पद्धतीने दिलेल्या वर्ग समीकरणाची मुळे शोधा $3x^2 - 6x + 3 = 0$

IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या (३/४ गुण)

61. दोन चौरसांच्या क्षेत्रफळांची बेरीज 640 चौ.मी. आहे.त्यांच्या परिमितींमधील फरक 64 मीटर आहे.

तर त्या चौरसांच्या बाजू शोधा.

62. दोन सलग विषम धन पूर्णांकांच्या वर्गांची बेरीज 290 आह ते पूर्णांक शोधा.

63. आईचे वय तिच्या मुलाच्या वयाच्या वर्गाच्या दुप्पट आहे 8 वर्षांनंतर आईचे वय तिच्या मुलाच्या वयाच्या तिप्पटीपेक्षा 4 वर्षांनी जास्त असेल. त्यांची वर्तमान वये शोधा.

64. काटकोन त्रिकोणाच्या उंची आणि पायामधील फरक 5 सेमी आहे. त्रिकोणाचे क्षेत्रफळ 150 चौ.सेमी असल्यास त्याचा पाया आणि उंची शोधा.

65. दोन सलग सम धन पूर्णांकांच्या वर्गांची बेरीज 164 आहे ते पूर्णांक शोधा.

66. ज्या दोन संख्यांची बेरीज 27 आणि गुणाकार 182 आहे, त्या दोन संख्या शोधा.

67. काटकोन त्रिकोणाची उंची त्याच्या पायापेक्षा 7 सेमीने कमी आहे. कर्ण 13 सेमी असल्यास इतर दोन बाजू शोधा.

68. एका विद्यार्थ्याने काही पुस्तके ₹60 ला खरेदी केली. त्याने त्याच रकमेत 5 पुस्तके अधिक घेतली असती तर प्रत्येक पुस्तकाची किंमत ₹1 ने कमी झाली असती. त्याने किती पुस्तके खरेदी केली?

69. वडिलांचे वय मुलाच्या वयापेक्षा 30 वर्षांनी जास्त आहे. 5 वर्षांनंतर त्यांच्या वयांचा गुणाकार 400 होईल. मुलाचे आणि वडिलांचे वर्तमान वय शोधा.

70. एक संख्या दुसऱ्या संख्येपेक्षा 3 ने जास्त आहे.त्यांच्या वर्गांची बेरीज 29 असल्यास त्या संख्या शोधा.

71. त्रिकोणाचा पाया त्याच्या उंचीच्या दुप्पटापेक्षा 4 सेमीने जास्त आहे .त्रिकोणाचे क्षेत्रफळ 48 चौ.सेमी असल्यास पाया आणि उंचीची लांबी शोधा.

72. काही विद्यार्थ्यांनी सहलीचे नियोजन केले. अन्नासाठी ₹900 चे बजेट होते. त्यापैकी 10 विद्यार्थी सहलीला आले नाहीत, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचा अन्नाचा खर्च ₹15 ने वाढला. सहलीला किती विद्यार्थी गेले?

73. एका आयताकृती शेताचे क्षेत्रफळ 60 चौ.मी. आणि परिमिती 32 मीटर आहे. शेताची लांबी आणि रुंदी शोधा.

74. एक रेल्वे 480 किमी अंतर समान वेगाने प्रवास करते. वेग 10 किमी/तासाने अधिक असता त्याच प्रवासासाठी 4 तास कमी लागले असते. रेल्वेचा वेग शोधा.

75. एका आयताकृती शेताचे क्षेत्रफळ 400 चौ.मी. आणि परिमिती 80 मीटर आहे.

शेताची लांबी आणि रुंदी शोधा.

76. इंधनाची बचत, वायुप्रदूषण टाळण्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी 'A' आणि 'B' हे दोन व्यक्ती कार्यालयात जाण्यासाठी 12 किमी सायकल चालवतात. 'B' चा सायकलचा वेग 'A' पेक्षा 2 किमी/तासाने जास्त आहे. त्यामुळे 'B' ला कार्यालयात पोहोचण्यासाठी 'A' पेक्षा 30 मिनिटे कमी लागतात. A आणि B यांना कार्यालयात पोहोचण्यासाठी लागणारा वेळ शोधा.

77. एका व्यापाऱ्याने एक वस्तू ₹24 ला विकली आणि खरेदी किमतीइतकाच टक्के नफा मिळवला.

वस्तूची खरेदी किंमत शोधा.

78. एका व्यापाऱ्याने एक वस्तू ₹24 ला विकली आणि खरेदी किमतीइतक्याच टक्के तोटा झाला.

वस्तूची खरेदी किंमत शोधा.

79. $(1 + m^2)x^2 + 2mcx + c^2 - a^2 = 0$ या समीकरणाची मुळे समान असल्यास सिद्ध करा की

$c^2 = a^2(1 + m^2)$.

80. $(b - c)x^2 + (c - a)x + (a - b) = 0$

दिलेल्या समीकरणाची मुळे समान असल्यास सिद्ध करा की $2b = a + c$.

81. स्थिर पाण्यात मोटारबोटीचा वेग 11 किमी/तास आहे 12 किमी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊन पुन्हा त्याच ठिकाणी प्रवाहाच्या दिशेने परत येण्यासाठी 2 तास 45 मिनिटे लागतात प्रवाहाचा वेग शोधा.

82. 'A' आणि 'B' या दोन विद्यार्थ्यांची वये अनुक्रमे 19 वर्षे आणि 15 वर्षे आहेत. त्यांच्या वयांचा गुणाकार 480 होण्यासाठी आणखी किती वर्षे लागतील?

83. एक मोटारबोट प्रवाहाच्या दिशेने 30 किमी जाते आणि पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणी परत येते. संपूर्ण प्रवासासाठी 4 तास 30 मिनिटे लागतात. प्रवाहाचा वेग 5 किमी/तास असल्यास स्थिर पाण्यात मोटारबोटीचा वेग शोधा.

84. दोन शहरांदरम्यान 132 किमी अंतर कापण्यासाठी एक्सप्रेस रेल्वेला प्रवासी रेल्वेपेक्षा 1 तास कमी लागतो एक्सप्रेस रेल्वेचा सरासरी वेग प्रवासी रेल्वेपेक्षा 11 किमी/तासाने जास्त आहे. दोन्ही रेल्वेचा सरासरी वेग शोधा.

85. व्यक्ती 'A' चे वय व्यक्ती 'B' पेक्षा 26 वर्षांनी जास्त आहे 3 वर्षांनंतर त्यांच्या वयांचा गुणाकार 360 होईल A आणि B यांचे वर्तमान वय शोधा.

86. एका शेतकऱ्याला 100 चौ.मी. क्षेत्रफळाची आयताकृती भाजीपाला बाग तयार करायची आहे.

त्याच्याकडे फक्त 30 मीटर काटेरी तार आहे.घराची कंपाउंडची भिंत चौथी बाजू म्हणून वापरून

तो बागेच्या तीन बाजूंना कुंपण घालतो.बागेची परिमाणे शोधा.

87. एका अपूर्णांकाचा छेद हा त्याच्या अंशाच्या दुप्पटापेक्षा 1 ने जास्त आहे. या अपूर्णांकाची आणि त्याच्या व्यस्ताची बेरीज $\frac{29}{10}$ दिलेली आहे. अपूर्णांक शोधा.

88. एका शाळेत इयत्ता 10 वीच्या वार्षिक परीक्षेत A+ श्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ₹1500 समान वाटण्याचे ठरले. परंतु निकालानंतर अपेक्षेपेक्षा 5 विद्यार्थी अधिक A+ श्रेणीत आले. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला मिळणारी रक्कम ₹25 ने कमी झाली. परीक्षेनंतर A+ श्रेणी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या शोधा.

89. दोन सलग धन पूर्णांकांची बेरीज 365 असल्यास ते पूर्णांक शोधा.

90. एका कुटीर उद्योगात दररोज ठराविक संख्येने मातीच्या वस्तू तयार केल्या जातात. एका विशिष्ट दिवशी प्रत्येक वस्तूच्या उत्पादनाचा खर्चत्या दिवशी तयार केलेल्या वस्तूंच्या संख्येच्या दुप्पटापेक्षा ₹3 ने जास्त होता.त्या दिवशी एकूण उत्पादन खर्च ₹90 होता तयार केलेल्या वस्तूंची संख्या आणि प्रत्येक वस्तूचा खर्च शोधा.

91. अंतराळवीर 'A' च्या स्पेसवॉकचा कालावधी अंतराळवीर 'B' च्या स्पेसवॉकच्या कालावधीपेक्षा 6 तासांनी जास्त आहे. दोघांनी आणखी 4 तास स्पेसवॉक केल्यास त्यांच्या कालावधींचा गुणाकार 720 तास होतो. A आणि B यांच्या स्पेसवॉकचा कालावधी शोधा.

92. काटकोन त्रिकोणाच्या उंची आणि पायामधील फरक 5 सेमी आहे. त्रिकोणाचे क्षेत्रफळ 150 चौ.सेमी असल्यास त्याचा पाया आणि उंची शोधा.

93. चौरस ABCD ची परिमिती चौरस PQRS च्या परिमितीपेक्षा 12 मीटरने कमी आहे. दोन्ही चौरसांच्या क्षेत्रफळांची बेरीज 117 चौ.मी. आहे. चौरस ABCD च्या क्षेत्रफळाचे चौरस PQRS च्या क्षेत्रफळाशी गुणोत्तर शोधा.

94. A आणि B हे दोन व्यक्ती एकाच प्रकारचे काम एकाच वेळी स्वतंत्रपणे सुरू करतात. B ला ते काम पूर्ण करण्यासाठी A पेक्षा 3 दिवस कमी लागतात.जर त्यांनी आणखी 4 दिवस काम केले, तर त्यांच्या कामाच्या दिवसांचा गुणाकार 130 होतो A आणि B यांना स्वतंत्रपणे काम पूर्ण करण्यासाठी किती दिवस लागतात ते शोधा.

5 : अंकगणिती क्रम

I. खालील प्रत्येक प्रश्न / अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत.

योग्य पर्याय निवडून अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

1. खालीलपैकी अंकगणिती क्रम कोणता ?

A) 1, 2, 4, 8, ...

B) 3, 7, 10, 14, ...

C) 1, 4, 9, 16, ...

D) 5, 9, 13, 17, ...

2. -7, -9, -11, -13, ... या अंकगणिती क्रमाचा सामान्य फरक किती?

A) -7

B) -2

C) 2

D) 3

3. 100, 93, 86, ... या अंकगणिती क्रमाचा सामान्य फरक किती?

A) -7

B) 7

C) 3 D) 5

4. अंकगणिती क्रमातील n व्या पदाचे सूत्र कोणते?

A) an = a + (n - 1)d

B) an = a + (n + 1)d

C) an = a - (n - 1)d

D) an = n + 1

5. अंकगणिती क्रमाचे n वे पद 5n + 3 असल्यास,

त्या क्रमाचे 3 रे पद किती?

A) 11

B) 18

C) 12

D) 13

6. अंकगणिती क्रमाचे n वे पद an = 3n - 2 असल्यास,

9 वे पद किती?

A) -25

B) 5

C) -5

D) 25

7. अंकगणिती क्रमाचे n वे पद an = 24 - 3n असल्यास,

2 रे पद किती?

A) 18

B) 15

C) 0

D) 2

8. अंकगणिती क्रमाचे n वे पद an = 2n - 1 असल्यास,

4 थे पद किती?

A) -7

B) 7

C) 5 D) 6

9. अंकगणिती क्रमामध्ये an = 3n + 4 असल्यास,

(n + 1) वे पद कोणते?

A) 3

B) 3n + 1

C) 3n + 7

D) 3n + 5

10. अंकगणिती क्रमामध्ये $a_n = 2n + 1$ असल्यास

क्रमाचा सामान्य फरक किती?

A) 0

B) 1

C) 2

D) 3

11. 6, x, 14 ही पदे अंकगणिती क्रमात असल्यास x ची किंमत किती?

A) 10

B) 20

C) 18

D) 12

12. अंकगणिती क्रमामध्ये $a = 12$, $d = 4$ आणि $a_n = 76$ असल्यास $n = ?$

A) 17

B) 18

C) 16

D) 19

13. अंकगणिती क्रमामध्ये $a = -7$, $d = 5$ असल्यास $a_{12} = ?$

A) 48

B) 45

C) 46

D) 42

14. अंकगणिती क्रमाचे पहिले पद 'm' आणि सामान्य फरक 3 असल्यास, त्या क्रमाचे 10 वे पद किती?

A) m + 25

B) m + 12

C) m + 30

D) m + 27

15. (2p + 1), 13, (5p - 3) ही अंकगणिती क्रमातील तीन सलग पदे असल्यास,

'p' ची किंमत किती?

A) 4

B) -4

C) 2

D) 3

16. 4, x_1, x_2, 22, 28..... ही पदे अंकगणिती क्रमात असल्यास,

x_1 आणि x_2 यांच्या किंमती अनुक्रमे किती?

A) 10, 16

B) 16, 10

C) 16, 22

D) 22, 16

17. एका अंकगणिती क्रमात 20 पदे आहेत. पहिले पद 2 आणि शेवटचे पद 78 असल्यास, तो अंकगणिती क्रम कोणता ?

A) 2, 5, 8, ...

B) 2, 7, 12, ...

C) 2, 6, 10, ...

D) 2, 4, 6, ...

18. 3, 7, 11, 15, ... या अंकगणिती क्रमाचे n वे पद कोणते?

A) an = 4n - 1

B) an = 3n - 4

C) an = 4n - 7

D) an = 4n + 1

19. पहिले पद 'a' आणि शेवटचे पद 'l' असलेल्या अंकगणिती क्रमातील सर्व पदांची बेरीज काढण्याचे सूत्र कोणते?

A) $s_n=\frac{n}{2}(a+l)$ B) $s_n=\frac{n}{2}(a-l)$ C) $s_n=\frac{n}{2}(a\times l)$ D) $s_n=\frac{n}{2}(a\div l)$

20. a_n, S_n आणि S_{n-1} हे अनुक्रमे n वे पद, पहिल्या n पदांची बेरीज आणि पहिल्या (n - 1) पदांची बेरीज दर्शवत असल्यास,

खालीलपैकी योग्य संबंध कोणता?

A) $S_{n-1} = a_n + S_n$

B) $a_n = S_n - S_{n-1}$

C) $S_n = S_{n-1} - a_n$

D) $S_n = a_n - S_{n-1}$

II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (१ गुण)

21. अंकगणिती क्रमाचे पहिले पद 'a' आणि शेवटचे पद 'a_n' असल्यास,

पहिल्या n पदांची बेरीज काढण्याचे सूत्र लिहा.

22. अंकगणिती क्रमामध्ये 'b' हे पहिले पद आणि 'd' हा सामान्य फरक असल्यास, त्याचे n वे पद लिहा.

23. जर a, a+d, a+2d, ... , l अंकगणिती क्रमात असेल, तर शेवटच्या पदापासून n वे पद शोधा.

24. अंकगणिती क्रमातील तीन सलग पदांची बेरीज 21 असल्यास, दुसरे पद शोधा.

25. अंकगणिती क्रमाचे 2 रे पद 7 आणि 5 वे पद 19 असल्यास, सामान्य फरक शोधा.

26. एका अंकगणिती क्रमातील पहिल्या 4 पदांची बेरीज 20 आणि पहिल्या 3 पदांची बेरीज 12 असल्यास, अंकगणिती क्रमाचे 4 थे पद शोधा.

27. अंकगणिती क्रमाचे 4 थे पद 11 आणि 3 रे पद 7 असल्यास, सामान्य फरक किती?

28. अंकगणिती क्रमाचे 3 रे पद 13 आणि 2 रे पद 8 असल्यास, क्रमाचे पहिले पद शोधा.

29. अंकगणिती क्रमाचे सर्वसाधारण पद लिहा.

30. 4, x, 28 ही पदे अंकगणिती क्रमात असल्यास x ची किंमत शोधा.

31. अंकगणिती क्रमाचे n वे पद $a_n = 7 - 4n$ असल्यास, सामान्य फरक शोधा.

32. अंकगणिती क्रमाचे n वे पद $a_n = 4n + 1$ असल्यास, अंकगणिती क्रमाची पहिली तीन पदे शोधा.

III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (२ गुण)

33. सूत्राचा वापर करून 2, 7, 12, ... या अंकगणिती क्रमाचे 15 वे पद शोधा.

34. 100, 96, 92, ... , 12 या अंकगणिती क्रमात किती पदे आहेत ते शोधा .

35. एका अंकगणिती क्रमात 10 पदे आहेत. शेवटचे पद 34 आणि सामान्य फरक 3 असल्यास,

अंकगणिती क्रमाचे पहिले पद शोधा.

36. -1, 3, 7, 11, ... या अंकगणिती क्रमातील 95 हे कितवे पद आहे, हे सूत्राचा वापर करून शोधा.

37. 1, 5, 9, 13, ... या अंकगणिती क्रमामध्ये 77 हे पद आहे की नाही, हे सूत्राचा वापर करून तपासा.

38. सूत्राचा वापर करून 5, 8, 11, ... या अंकगणिती क्रमाचे 26 वे पद शोधा.

39. सूत्राचा वापर करून 2, 5, 8, ... या अंकगणिती क्रमाचे 30 वे पद शोधा.

40. सूत्राचा वापर करून 2, 6, 10, 14, ... या अंकगणिती क्रमाचे 23 वे पद शोधा.

41. सूत्राचा वापर करून 4, 9, 14, 19, ... या अंकगणिती क्रमाचे 40 वे पद शोधा.

42. सूत्राचा वापर करून 3, 6, 9, 12, ... या अंकगणिती क्रमाचे 35 वे पद शोधा.

43. सूत्राचा वापर करून 6, 10, 14, 18, ... या अंकगणिती क्रमाचे 18 वे पद शोधा.

44. सूत्राचा वापर करून 11, 14, 17, ... या अंकगणिती क्रमाचे 20 वे पद शोधा.

45. सूत्राचा वापर करून 3, 7, 11, ... या अंकगणिती क्रमाचे 25 वे पद शोधा.

46. सूत्राचा वापर करून 3, 8, 13, 18, ... या अंकगणिती क्रमातील 78 हे कितवे पद आहे ते शोधा.

47. 7, 13, 19, ... 205 या अंकगणिती क्रमात किती पदे आहेत ते शोधा.

48. अंकगणिती क्रमाचे 17 वे पद हे 10 व्या पदापेक्षा 7 ने जास्त आहे. सामान्य फरक शोधा.

49. तीन अंकी किती संख्या 7 ने विभाज्य आहेत ते शोधा.

50. 10 आणि 250 यांच्या दरम्यान 4 च्या पटीतील किती संख्या आहेत ते शोधा.

51. एका फुलांच्या बागेत पहिल्या रांगेत 23 गुलाबाची रोपे, दुसऱ्या रांगेत 21, तिसऱ्या रांगेत 19 आणि पुढे अशीच रोपे आहेत. शेवटच्या रांगेत 5 गुलाबाची रोपे आहेत. बागेत रोपांच्या एकूण किती रांगा आहेत?

52. सूत्राचा वापर करून 2, 7, 12, ... या अंकगणिती क्रमातील 47 हे कितवे पद आहे ते शोधा.

53. एका अंकगणिती क्रमाचे पहिले पद 1 आणि 14 वे पद 53 आहे. त्याचे n वे पद शोधा.

54. एका अंकगणिती क्रमात $S_{20} = 820$ आणि $a_{20} = 79$ असल्यास, त्याचे पहिले पद शोधा.

55. 201 आणि 401 यांच्या दरम्यान 6 ने भाग जाणाऱ्या किती संख्या आहेत ते शोधा.

56. सूत्राचा वापर करून 11, 15, 19, 23, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 20 पदांची बेरीज शोधा.

57. सूत्राचा वापर करून 6, 10, 14, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 20 पदांची बेरीज शोधा.

58. सूत्राचा वापर करून 5, 8, 11, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 20 पदांची बेरीज शोधा.

59. सूत्राचा वापर करून 3, 7, 11, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 20 पदांची बेरीज शोधा.

60. सूत्राचा वापर करून 3, 7, 11, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 10 पदांची बेरीज शोधा.

61. सूत्राचा वापर करून 11, 14, 17, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 20 पदांची बेरीज शोधा.

62. सूत्राचा वापर करून 2, 5, 8, 11, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 20 पदांची बेरीज शोधा.

63. सूत्राचा वापर करून 4, 8, 12, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 30 पदांची बेरीज शोधा.

64. सूत्राचा वापर करून 5, 10, 15, ... या अंकगणिती क्रमातील पहिल्या 10 पदांची बेरीज शोधा.

65. 6 ने भाग जाणाऱ्या पहिल्या 40 धन पूर्णांकांची बेरीज शोधा.

66. 8च्या पटीतील पहिल्या 15 संख्यांची बेरीज शोधा

IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (३ गुण)

67. एका अंकगणिती क्रमातील पहिल्या 6 पदांची बेरीज 114 आहे, पहिल्या 5 पदांची बेरीज 80 असेल तर अंकगणिती क्रम शोधा.

68. अंकगणिती क्रमाचे 7 वे पद हे 2ऱ्या पदाच्या चार पट आहे.

तसेच 12 वे पद हे 4 थ्या पदाच्या तिप्पटीपेक्षा 2 ने जास्त आहे. तर अंकगणिती क्रम शोधा.

69. ज्या अंकगणिती क्रमाचे 3 रे पद 16 आहे आणि 7 वे पद हे 5 व्या पदापेक्षा 12 ने जास्त आहे,

तर तो अंकगणिती क्रम शोधा.

70. एका अंकगणिती क्रमाचे 5 वे पद 26 आहे आणि सामान्य फरक हा पहिल्या पदाच्या तिप्पट आहे तर

अंकगणिती क्रमातील पहिल्या 20 पदांची बेरीज शोधा.

71. तीन अंकी संख्येचे अंक अंकगणिती क्रमात आहेत आणि त्या अंकांची बेरीज 15 आहे.एकक स्थानावरील आणि शतक स्थानावरील अंकांची अदलाबदल केल्यास मिळणारी संख्या मूळ संख्येपेक्षा 594 ने कमी आहे.

तर मूळ संख्या शोधा.

72. 56 ही संख्या 4 भागांत विभागली आहे आणि ते भाग अंकगणिती क्रमातील पदे आहेत. त्याच्या शेवटच्या पदांच्या गुणाकाराचे मधल्या पदांच्या गुणाकाराशी गुणोत्तर 5 : 6 असल्यास, चार पदे शोधा.

73. 25 से .मी. लांबीची सरळ लाकडी काठी 5 भागांत कापली आहे आणि त्या भागांच्या लांबी अंकगणिती क्रमात आहेत. प्रत्येक भागाच्या वर्गांची बेरीज 135 आहे. तर प्रत्येक भागाची लांबी शोधा.

74. अंकगणिती क्रमाचे 9 वे पद हे 2ऱ्या पदाच्या पाच पटीपेक्षा 1 ने जास्त आहे आणि 12 वे पद हे 5 व्या पदाच्या दुप्पटीपेक्षा 7 ने जास्त आहे.अंकगणिती क्रम शोधा.

75. 1 आणि 100 यांच्या दरम्यान असलेल्या आणि 5 ने भागल्यावर बाकी 1 उरणाऱ्या सर्व पूर्णांकांची बेरीज शोधा.

76. अंकगणिती क्रमातील तीन संख्यांची बेरीज 216 आहे. सर्वांत मोठी संख्या ही सर्वांत लहान संख्येच्या 7 पट आहे. त्या संख्या शोधा.

77. अंकगणिती क्रमातील 4 थे आणि 8 वे पद यांची बेरीज 24 आहे. तसेच 6 वे आणि 10 वे पद यांची बेरीज 44 आहे. क्रमाची पहिली तीन पदे शोधा.

78. त्रिकोणाचे तीन कोन अंकगणिती क्रमात आहेत. सर्वांत लहान कोन हा सर्वांत मोठ्या कोनाच्या अर्धा असल्यास, त्रिकोणाचे तिन्ही कोन शोधा.

79. अंकगणिती क्रमाचे m वे पद 1/n आणि n वे पद 1/m असल्यास, mn वे पद 1 आहे हे सिद्ध करा.

80. अंकगणिती क्रमाचे p वे पद 'a', q वे पद 'b' आणि r वे पद 'c' असल्यास, सिद्ध करा:

$a(q - r) + b(r - p) + c(p - q) = 0$

81. अंकगणिती क्रमातील पहिल्या 9 पदांची बेरीज 144 आणि 9 वे पद 28 आहे. पहिले पद आणि समान फरक शोधा.

82. ज्या अंकगणिती क्रमाचे 11 वे पद 38 आणि 16 वे पद 73 आहे, त्या क्रमाचे 31 वे पद शोधा.

83. 3, 15, 27, 39, ... या अंकगणिती क्रमातील कोणते पद हे 54 व्या पदापेक्षा 132 ने जास्त असेल?

84. ज्या अंकगणिती क्रमाचे 3 रे पद 16 आहे आणि 7 वे पद हे 5 व्या पदापेक्षा 12 ने जास्त आहे, अंकगणिती क्रमा शोधा.

85. 9, 17, 25, ... या अंकगणिती क्रमातील किती पदांची बेरीज 636 होईल?

86. d = 7 आणि 22 वे पद 149 असलेल्या अंकगणिती क्रमातील पहिल्या 22 पदांची बेरीज शोधा.

87. 0 आणि 50 यांच्या दरम्यानच्या विषम संख्यांची बेरीज शोधा.

IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (४/५ गुण)

88. एका अंकगणिती क्रमाचे पहिले पद 22, n वे पद -11 आणि पहिल्या n पदांची बेरीज 66 आहे. क्रमाचे पदांची संख्या आणि सामान्य फरक शोधा.

89. पाच पूर्णांक अंकगणिती क्रमात आहेत. पाचव्या पदाच्या वर्गातून पहिल्या पदाचा वर्ग वजा केल्यावर 192 मिळते आणि 2 रे व 4 थे पद यांची बेरीज 16 आहे. क्रमातील पाचही पदे शोधा.

90. एका अंकगणिती क्रमातील पहिल्या n पदांची बेरीज 210 आणि पहिल्या (n - 1) पदांची बेरीज 171 आहे. क्रमाचे पहिले पद 3 असल्यास, अंकगणिती क्रम शोधा. तसेच तिचे 20 वे पद शोधा.

91. n बाजू असलेल्या बहुभुजाकृतीच्या अंतर्गत कोनांची बेरीज $(n - 2) \times 180°$ असते. एका पंचकोनाचे अंतर्गत कोन अंकगणिती क्रमात आहेत. सर्वांत लहान कोन 72° असल्यास, पंचकोनाचे सर्व कोन शोधा.

92. एक व्यक्ती सोमवार ते शनिवार एका दुकानात काम करतो. त्याची दररोजची कमाई अंकगणिती क्रमात आहे.

सोमवार ते बुधवारची एकूण कमाई ₹525 आहे आणि शुक्रवारी त्याला सोमवारच्या कमाईपेक्षा ₹100 जास्त मिळतात. त्याची दररोजची कमाई शोधा.

93 चौकोनाचे कोन अंकगणिती क्रमात आहेत. एका विरुद्ध कोनांच्या जोडीची बेरीज 130° असल्यास,चौकोनाचे सर्व कोन शोधा.

94. एका अंकगणिती क्रमात 16 पदे आहेत. सर्व पदांची बेरीज 768 आहे. शेवटचे पद 93 असल्यास, अंकगणिती क्रम शोधा. तसेच सूत्राचा वापर करून सिद्ध करा की या क्रमातील सर्व पदांची बेरीज ही पहिल्या 16 विषम नैसर्गिक संख्यांच्या बेरजेच्या 3 पट आहे.

95. एका अंकगणिती क्रमाचे 7 वे पद हे 2ऱ्या पदाच्या पाच पट आहे आणि 5 वे पद हे 3ऱ्या पदाच्या दुप्पटीपेक्षा 1 ने कमी आहे. अंकगणिती क्रम लिहा. तसेच सूत्राचा वापर करून या क्रमाचे 15 वे पद शोधा.

96. अंकगणिती क्रमातील 11 व्या आणि 8 व्या पदांचे गुणोत्तर 3 : 2 आहे. पहिल्या 5 पदांच्या बेरजेचे पहिल्या 21 पदांच्या बेरजेशी गुणोत्तर शोधा.

97. अंकगणिती क्रमाचे 7 वे पद हे 2ऱ्या पदाच्या चार पट आहे आणि 12 वे पद हे 4 थ्या पदाच्या तिप्पटीपेक्षा 2 ने जास्त आहे. अंकगणिती क्रम शोधा.

98. अंकगणिती क्रमाचे p वे पद q आणि q वे पद p आहे. तर क्रमाचे p + q - r आहे हे सिद्ध करा.

99. एका अंकगणिती क्रमात पाच पदे आहेत. या पाच पदांची बेरीज 55 आहे आणि 4 थे पद हे पहिल्या दोन पदांच्या बेरजेपेक्षा 5 ने जास्त आहे. अंकगणिती क्रमातील पदे शोधा.

100. एका अंकगणिती क्रमाचे 6 वे पद हे 3ऱ्या पदाच्या दुप्पटीपेक्षा 1 ने जास्त आहे. 4 थे आणि 5 वे पद यांची बेरीज ही 2ऱ्या पदाच्या पाच पट आहे. अंकगणिती क्रमाचे 10 वे पद शोधा.

101. अंकगणिती क्रमातील पहिल्या n पदांची बेरीज $S_n = 5n - n^2$ आहे. अंकगणिती क्रम लिहा. तिचे 21 वे पद आणि पहिल्या 21 पदांची बेरीज शोधा.

102. दोन वेगवेगळ्या अंकगणिती क्रमाचा सामान्य फरक समान आहे. पहिल्या क्रमाचे पहिले पद हे दुसऱ्या क्रमाच्या पहिल्या पदापेक्षा 3 ने जास्त आहे पहिल्या क्रमाचे 7 वे पद 28 आणि दुसऱ्या क्रमाचे 8 वे पद 29 असल्यास, दोन्ही अंकगणिती क्रम शोधा.

103. एका अंकगणिती क्रमात 30 पदे आहेत क्रमाचे 17 वे पद हे 5 व्या पदाच्या तिप्पटीपेक्षा 4 ने जास्त आहे. 10 वे पद 31 आहे. क्रमाचे शेवटची तीन पदे आणि संपूर्ण क्रम शोधा.

104. एका अंकगणिती क्रमात 14 पदे आहेत. या क्रमाचे पहिले पद हे पहिल्या 8 धन पूर्णांकांच्या बेरजेइतके आहे.

पहिल्या आणि शेवटच्या पदांची बेरीज 111 असल्यास, क्रमाची शेवटची तीन पदे शोधा.

105. एका अंकगणिती क्रमात 37 पदे आहेत. शेवटच्या तीन पदांची बेरीज 429 आहे आणि मधले पद 75 आहे. या क्रमाचे 33 वे पद हे 28 व्या पदापेक्षा कितीने जास्त आहे ते शोधा.

106. अंकगणिती क्रमाचे 10 वे पद हे पहिल्या पदाच्या तिप्पटीपेक्षा 2 ने जास्त आहे आणि 8 वे पद हे पहिल्या पदाच्या दुप्पटीपेक्षा 6 ने जास्त आहे. या क्रमातील किती पदांची बेरीज 540 आहे ते शोधा.

107. एका अंकगणिती क्रमामध्ये पहिले पद आणि सामान्य फरक यांचे गुणोत्तर 3 : 2 आहे आणि पहिल्या 26 पदांची बेरीज 1456 आहे. अंकगणिती क्रम शोधा. तसेच क्रमातील कितवे पद 62 आहे ते शोधा.

108. एका अंकगणिती क्रमातील पहिल्या 6 पदांची बेरीज 42 आहे.या क्रमातील 10 व्या आणि 30 व्या पदांचे गुणोत्तर 1 : 3 असल्यास,13 वे पद शोधा.

109. अंकगणिती क्रमातील 4 थे आणि 8 वे पद यांची बेरीज 24 आहे आणि 6 वे आणि 10 वे पद यांची बेरीज 44 आहे. अंकगणिती क्रम शोधा.

आणि त्याचे 25 वे पद शोधा.

110. एका अंकगणिती क्रमात चार पदे आहेत आणि त्यांची बेरीज 32 आहे.पहिल्या व शेवटच्या पदांच्या गुणाकाराचे दुसऱ्या व तिसऱ्या पदांच्या गुणाकाराशी गुणोत्तर 7 : 15 आहे. चारही पदे शोधा.

111. एका पुस्तकात 432 पाने आहेत. एका विद्यार्थ्याला दररोज ठराविक संख्येने पाने वाचायची आहेत.

पहिल्या दिवशी तो 25 पाने वाचतो. पुढील दिवसापासून तो मागील दिवसापेक्षा दररोज 2 पाने जास्त वाचण्याचे ठरवतो. सूत्राचा वापर करून 12 व्या दिवशी तो किती पाने वाचेलआणि संपूर्ण पुस्तक वाचण्यासाठी त्याला किती दिवस लागतील ते शोधा.

अध्याय- 6 त्रिकोण

खालील प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा व त्याच्या अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

1) खालीलपैकी नेहमी समान असणाऱ्या आकृत्या कोणत्या?

A) कोणतेही दोन समभुज त्रिकोण

B) चौरस आणि आयत

C) चौरस आणि समभुज चौकोन

D) कोणतेही दोन समलंब चौकोन

2) खालीलपैकी कोणती त्रिकोणांची जोडी नेहमी समरूप असते?

A) दोन समद्विबाहू त्रिकोण

B) दोन विषमभुज त्रिकोण

C) दोन समभुज त्रिकोण

D) दोन काटकोन त्रिकोण

3) ΔABC मध्ये DE || AB. जर CD = 3 सेमी, EC = 4 सेमी, BE = 6 सेमी, तर DA ची लांबी किती?

A) 7.5 सेमी

B) 3 सेमी

C) 4.5 सेमी

D) 6 सेमी

4) त्रिकोण ABC च्या बाजू AB आणि AC वर D आणि E हे बिंदू आहेत. जर DE || BC, AD = 2 सेमी, BD = 3 सेमी आणि BC = 7.5 सेमी असेल, तर DE ची लांबी किती?

A) 2.5 सेमी B) 3 सेमी C) 5 सेमी D) 6 सेमी

5) ΔABC आणि ΔDEF हे समरूप आहेत आणि दिलेल्या आकृतीनुसार योग्य संबंध कोणता?

A) ∠B = ∠E

B) ∠A = ∠D

C) ∠B = ∠D



51

D) ∠A = ∠F

6) आकृतीमध्ये x ची किंमत किती?

A) 4 सेमी

B) 5 सेमी

C) 6 सेमी

D) 8 सेमी



7) ΔABC मध्ये DE || BC, AD = x, DB = x − 2, AE = x + 2 आणि EC = x − 1, तर x ची किंमत किती?

A) 3

B) 4

C) 5

D) 3.5

8) ΔABC हा ΔDEF शी समरूप आहे. जर 2AB = DE आणि BC = 8 सेमी, तर EF ची लांबी किती?

A) 12 सेमी

B) 4 सेमी

C) 16 सेमी D) 8 सेमी

9) ΔABC मध्ये , AE = $\frac{1}{4}$ AC, AB = 6 सेमी आणि DE || BC, तर AD ची लांबी किती?

A) 2 सेमी

B) 1.2 सेमी

C) 1.5 सेमी

D) 4 सेमी

10) आकृतीमध्ये DE || AC असल्यास खालीलपैकी योग्य संबंध कोणता?



A) x = $\frac{a+b}{ay}$ B) y= $\frac{ax}{a+b}$ C) x = $\frac{ay}{a+b}$ D) $\frac{x}{y} = \frac{a}{b}$

11) ΔABC ~ ΔDEF. जर AB = 4 सेमी, BC = 3.5 सेमी, CA = 2.5 सेमी आणि DF = 7.5 सेमी असेल, तर ΔDEF ची परिमिती किती?

A) 10 सेमी

B) 14 सेमी

C) 30 सेमी

D) 25 सेमी

12) आकृतीमध्ये ΔACB ~ ΔAPQ. AB = 6 सेमी, BC = 8 सेमी आणि PQ = 4 सेमी, तर AQ ची लांबी किती?



A) 2 सेमी B) 2.5 सेमी C) 3 सेमी D) 3.5 सेमी

13) आकृतीमध्ये x ची किंमत किती?

A) 4 सेमी B) 5 सेमी C) 8 सेम D) 3 सेमी

14) ΔLMN मध्ये ∠L = 50° आणि ∠N = 60°. जर ΔLMN ~ ΔP(ी?



A) 50°

B) 70°

C) 60°

D) 40°

15) ΔABC च्या AB आणि AC बाजूंचे D आणि E हे अनुक्रमे मध्यबिंदू आहेत. जर BC = 6 सेमी आणि DE || BC असेल, तर DE ची लांबी किती?

A) 12 सेमी B) 3 सेमी C) 5 सेमी D) 6 सेमी

16) समलंब चौकोन ABCD मध्ये AB || DC आणि P, Q हे अनुक्रमे AD व BC बाजूंवरील बिंदू आहेत. जर PQ || DC, PD = 18 सेमी, BQ = 35 सेमी आणि QC = 15 सेमी असेल, तर AD ची लांबी किती?

A) 5 सेमी

B) 57 सेमी

C) 60 सेमी

D) 62 सेमी



17) ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. P हा BC वरील बिंदू आहे आणि AB ला पुढे वाढविल्यावर DP ला L येथे छेदते. खालीलपैकी योग्य संबंध कोणता?

(A) $\frac{DP}{BL} = \frac{DC}{PL}$ (B) $\frac{DP}{PL} = \frac{DC}{BL}$

(B) $\frac{DP}{PL} = \frac{DC}{BL}$



18) आकृतीमध्ये x ची किंमत किती?



A) 64 सेमी B) 60 सेमी C) 25 सेमी D) 53 सेमी

19) 5 मीटर उंचीच्या ध्वजस्तंभाची सावली 4 मीटर लांब आहे. त्याच वेळी 20 मीटर लांब सावली पडणाऱ्या झाडाची उंची किती? A) 25 मी B) 30 मी C) 60 मी D) 20 मी

20) ΔABC आणि ΔDEF मध्ये ∠B = ∠E, ∠C = ∠F आणि AB = 3DE असल्यास, हे त्रिकोण कसे आहेत?

A) एकरूप परंतु समरूप नाहीत

B) समरूप परंतु एकरूप नाहीत

C) ना एकरूप ना समरूप

D) एकरूप आणि समरूप

21) ΔADE आणि ΔABC मध्ये ∠D = ∠B आणि ∠E = ∠C असल्यास खालीलपैकी चुकीचा संबंध कोणता?

A) $\frac{AD}{DB} = \frac{AE}{CE}$ B) $\frac{AD}{AB} = \frac{AE}{AC}$ C) $\frac{DE}{BC} = \frac{AD}{AB}$ D) $\frac{AE}{AC} = \frac{DE}{BC}$

22) आकृतीमध्ये D आणि E हे अनुक्रमे AB व AC चे मध्यबिंदू आहेत. जर DE = 4 सेमी असेल, तर BC किती?

A) 4 सेमी

B) 6 सेमी

C) 8 सेमी

D) 12 सेमी



23) आकृतीमध्ये XY || BC असल्यास खालीलपैकी कोणते प्रमाण योग्य आहे?



A) $\frac{AX}{AY}$ B) $\frac{AX}{XB}$ C) $\frac{AY}{AC}$ D) $\frac{AC}{AY}$

24) आकृतीमध्ये EF || CA आणि FG || AB असल्यास DE/EC ची किंमत किती?



A) $\frac{DG}{GB}$ B) $\frac{GB}{DG}$ C) $\frac{AF}{DF}$ D) $\frac{AB}{AD}$

25) आकृतीमध्ये AB || PQ. जर PQ = 1.5 सेमी, QC = 2 सेमी आणि BQ = 8 सेमी असेल, तर AB ची लांबी किती?

A) 10 सेमी

B) 7.5 सेमी

C) 9.5 सेमी



D) 3.5 सेमी

26) आकृतीमध्ये DE || BC आणि AD = x, DB = y, AE = m व CE = n असल्यास खालीलपैकी योग्य संबंध कोणता?



A) $\frac{x}{y} = \frac{m}{m+n}$

B) $\frac{x}{y} = \frac{n}{m}$

C) $\frac{x+y}{y} = \frac{m}{m+n}$

D) $\frac{x}{x+y} = \frac{m}{m+n}$

27) आकृतीमध्ये PQR ~ ABC   बाजूंची जोडी कोणती?

A) PQ आणि AB

B) PR आणि AB

C) QR आणि AC

D) PR आणि BC

28) आकृतीमध्ये DE || BC. जर AD = 2 सेमी, AE = 1 सेमी आणि BD = 6 सेमी असेल, तर EC ची लांबीकिती?



A) 2 सेमी B) 3 सेमी C) 4 सेमी D) 5 सेमी

II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (१ गुण)

29) समरूप आकृती म्हणजे काय?

30) बहुभुजांच्या समरूपतेसाठी दोन अटी लिहा.

31) मूलभूत समानुपात प्रमेय (Basic Proportionality Theorem / थेल्स प्रमेय) सांगा.

32) त्रिकोणांच्या समरूपतेचे AAA निकष सांगा

33) दिलेल्या आकृतीमध्ये ΔABC ~ ΔQRP सिद्ध करण्यासाठी कोणता समरूपता निकष वापरला आहे ते लिहा.



34) दिलेल्या आकृतीमध्ये ΔABC मधील AB या बाजूस अनुरूप असणारी ΔPQR मधील बाजू लिहा.



III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (२ गुण)

35) दिलेल्या आकृतीमध्ये x ची किंमत शोधा.



36) त्रिकोण ABC मध्ये DE || BC. जर AD = 1.5 सेमी, BD = 3 सेमी आणि AE = 1 सेमी असेल, तर EC ची लांबी शोधा.



37) आकृतीमध्ये ΔPOQ ~ ΔROS आणि PQ || SR. जर PQ : SR = 1 : 2 असेल, तर OS : OQ शोधा.



38) दिलेल्या आकृतीमध्ये FC ची लांबी शोधा.



39) 6 मीटर लांबीचा उभा खांब जमिनीवर 4 मीटर लांब सावली टाकतो. त्याच वेळी एका इमारतीची सावली 28 मीटर लांब आहे. इमारतीची उंची शोधा.

40) समांतरभुज चौकोन ABCD मध्ये E हा AD चा मध्यबिंदू आहे आणि BE ही रेषा CD ला F येथे छेदते.

सिद्ध करा की ΔABE ~ ΔCFB.

41) ΔABC मध्ये DE || BC. जर AD = 2.4 सेमी, AB = 3 सेमी आणि AC = 5 सेमी असेल, तर AE शोधा.

42) AB आणि CD हे दोन रेषाखंड 'O' या बिंदूवर एकमेकांना छेदतात. AC आणि BD असे जोडा की AC || BD. सिद्ध करा की ΔAOC ~ ΔBOD.

43) समलंब चौकोन ABCD मध्ये AB || DC. कर्ण AC आणि BD हे O या बिंदूवर एकमेकांना छेदतात. सिद्ध करा की:

AO/OC = BO/OD.



44) त्रिकोण ABC मध्ये DE || BC. जर AD = x, DB = x − 2, AE = x + 2 आणि EC = x − 1 असेल, तर x शोधा आणि त्यावरून AD : DB शोधा.



45) आकृतीमध्ये ABC हा समद्विबाहू त्रिकोण असून AB = AC आहे. CB ला पुढे वाढविल्यावर E हा बिंदू घेतला आहे. जर AD ⊥ BC आणि EF ⊥ AC असेल, तर सिद्ध करा की ΔABD ~ ΔECF.



46) आकृतीमध्ये, $\frac{QR}{QS} = \frac{QT}{PR}$ आणि ∠1 = ∠2 सिद्ध करा की ΔPQS ~ ΔTQR.



IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (३ गुण)

47) त्रिकोण ABC च्या बाजू BC वर D हा बिंदू असा आहे की ∠ADC = ∠BAC.सिद्ध करा की: $AC^2 = BC \times CD$.

48) आकृतीमध्ये ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. P हा AB ला 2:3 या प्रमाणात विभागतो आणि Q हा DC ला 4:1 या प्रमाणात विभागतो. सिद्ध करा की: OA = 2OC



49) आकृतीमध्ये OP, OQ आणि OR वर अनुक्रमे A, B आणि C हे बिंदू आहेत, जसे की AB || PQ आणि AC || PR.सिद्ध करा की BC || QR



50) त्रिकोण ABC च्या AB, BC या बाजू आणि AD हा मध्यिका हे अनुक्रमे त्रिकोण PQR च्या PQ, QR या बाजू आणि PM या मध्यिकेशी समानुपाती आहेत.सिद्ध करा की: ΔABC ~ ΔPQR



51) आकृतीमध्ये PS/SQ = PT/TR आणि ∠PST = ∠PRQ.सिद्ध करा की PQR हा समद्विबाहू त्रिकोण आहे.



52) ABC हा काटकोन त्रिकोण आहे. जर ∠BAC = 90° आणि AD ⊥ BC असेल, तर सिद्ध करा:

$AB^2 = BC \times BD$.

53) समद्विबाहू त्रिकोण PQR मध्ये PQ = PR आहे. ∠P चा कोनदुभाजक QR ला 'O' येथे छेदतो.

सिद्ध करा की: OQ/OR = 1.

54) ABCD हा समांतरभुज चौकोन आहे. E हा BC वरील बिंदू आहे. कर्ण BD हा A आणि E यांना जोडणाऱ्या रेषेला F येथे छेदतो. सिद्ध करा की: DF × EF = FB × FA.

55) आकृतीमध्ये, जर ΔABE ≅ ΔACD असेल, तर सिद्ध करा की: ΔADE ~ ΔABC.



56) E हा समांतरभुज चौकोन ABCD च्या AD बाजूवरील पुढे घेतलेला बिंदू आहे आणि BE ही रेषा CD ला F येथे छेदते. सिद्ध करा की: ΔABE ~ ΔCFB.

57) आकृतीमध्ये ΔABC चे AD आणि CE हे उंचीखंड एकमेकांना P या बिंदूवर छेदतात.

सिद्ध करा

(i) ΔAEP ~ ΔCDP

(ii) ΔABD ~ ΔCBE

(iii) ΔAEP ~ ΔADB

(iv) ΔPDC ~ ΔBEC



58) CD आणि GH हे अनुक्रमे ∠ACB आणि ∠EGF चे कोनदुभाजक आहेत. D आणि H हे अनुक्रमे ΔABC आणि ΔEFG च्या AB व FE बाजूंवर आहेत.

जर ΔABC ~ ΔFEG असेल, तर सिद्ध करा:

(i) ΔDCB ~ ΔHGE

(ii) ΔDCA ~ ΔHGF.

59) समद्विबाहू त्रिकोण PQR मध्ये PQ = PR आहे. ∠P चा कोनदुभाजक QR ला 'O' येथे छेदतो.

सिद्ध करा की: $\frac{OQ}{OR} = 1$

V. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (४ गुण)

60) मूलभूत समानुपात प्रमेय (Basic Proportionality Theorem) सांगा आणि सिद्ध करा.

61) सिद्ध करा:

"दोन त्रिकोणांतील अनुरूप कोन समान असतील, तर त्यांच्या अनुरूप बाजू समान प्रमाणात असतात आणि म्हणून ते दोन त्रिकोण समरूप असतात."

62) सिद्ध करा:

"दोन त्रिकोणांपैकी एका त्रिकोणाच्या बाजू दुसऱ्या त्रिकोणाच्या अनुरूप बाजूंच्या समान प्रमाणात असतील, तर त्यांचे अनुरूप कोन समान असतात आणि म्हणून ते दोन त्रिकोण समरूप असतात."

63) सिद्ध करा: "एका त्रिकोणातील एक कोन दुसऱ्या त्रिकोणातील एका कोनाइतका समान असेल आणि त्या कोनांना समाविष्ट करणाऱ्या बाजू समानुपाती असतील, तर ते दोन त्रिकोण

aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

अध्याय ७ : सहनिर्देशक भूमिती

I. खालील प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा व त्याच्या अक्षरासह संपूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

1) x-अक्षावर असलेल्या बिंदूचे निर्देशांक कोणते?

A) (x, 0)

B) (y, 0)

C) (0, x)

D) (0, y)

2) y-अक्षावर असलेल्या बिंदूचे निर्देशांक कोणते?

A) (x, 0)

B) (y, 0)

C) (0, x)

D) (0, y)

3) A(2, 5) या बिंदूचे y-अक्षापासूनचे लंब अंतर किती?

A) 2 एकके

B) 5 एकके

C) 7 एकके

D) 3 एकके

4) (3, -4) या बिंदूचे x-अक्षापासूनचे अंतर किती?

A) 3 एकके

B) 5 एकके

C) 4 एकके

D) -4 एकके

5) आरंभबिंदूचे निर्देशांक कोणते?

A) (1, 1)

B) (2, 2)

C) (0, 0)

D) (3, 3)

6) P(a, b) या बिंदूचे आरंभबिंदू (0,0) पासूनचे अंतर किती?

A) $a^2 + b^2$ B) $\sqrt{(a - b)}$ C) $\sqrt{(a + b)}$ D) $\sqrt{(a^2 + b^2)}$

7) P(x, y) या बिंदूचे आरंभबिंदूपासूनचे अंतर किती?

A) $x^2 + y^2$

B) $\sqrt{(x^2 - y^2)}$

C) $\sqrt{(x + y)}$

D) $\sqrt{(x^2 + y^2)}$

8) A(5, k) आणि (1, 0) या दोन बिंदूंमधील अंतर 5 एकके आहे. 'k' ची किंमत किती?

A) 3

B) -3

C) -2

D) 4

9) (2, 3) आणि (4, 7) हे दोन बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू कोणता?

A) (-3, 5)

B) (1, 2)

C) (3, 5)

D) (6, 10)

10) (-4, 2) आणि (-2, 6) हे दोन बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू कोणता?

A) (3, 2)

B) (-3, 4)

C) (-2, 3)

D) (-4, 1)

11) A(-5, 9) आणि B(8, 9) या दोन बिंदूंना जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू P($\frac{x}{2}$, 4)असल्यास 'x' ची किंमत किती?

A) 13

B) 3

C) -2

D) -3

12) A (x_1, y_1) आणि B (x_2, y_2) या दोन बिंदूंमधील अंतर किती?

A) $\sqrt{(x_2 - x_1)^2 + (y_2 - y_1)^2}$ B) $\sqrt{(x_2 + x_1)^2 - (y_2 + y_1)^2}$

C) $\sqrt{(x_1 + x_2) + (y_2 + y_1)}$ D) $\sqrt{x^2 + y^2}$

13) (-3, 4) या बिंदूचे आरंभबिंदूपासूनचे अंतर किती?

A) 7

B) 1

C) 5

D) -5

14) खालीलपैकी x-अक्षावरील बिंदू कोणता?

A) (-2, 0)

B) (0, 2)

C) (3, 3)

D) (0, -2)

II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (१ गुण)

15) (0,0) आणि (-3,5) या बिंदूंमधील अंतर शोधा.

16) (6,8) या बिंदूचे आरंभबिंदूपासूनचे अंतर शोधा.

17) A(x_1, y_1) आणि B(x_2, y_2) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदूचे निर्देशांक लिहा.

18) A(5,4) आणि B(1,4) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू शोधा.

19) (2,3) आणि (4,3) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू शोधा.

20) मध्यबिंदू सूत्राचा वापर करून P(3,4) आणि Q(5,6) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू शोधा.

21) (6,3) आणि (4,y) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू (5,5) असल्यास 'y' ची किंमत शोधा.

22) $A(x_1,y_1)$ आणि $B(x_2,y_2)$ हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला $m_1:m_2$ या प्रमाणात अंतर्गत विभागणाऱ्या P या बिंदूचे निर्देशांक लिहा.

23) $A(x_1,y_1)$ आणि $B(x_2,y_2)$ हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला 1:1 या प्रमाणात अंतर्गत विभागणाऱ्या P या बिंदूचे निर्देशांक लिहा.

III. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (२ गुण)

24) अंतर सूत्राचा वापर करून P(2,3) आणि Q(4,1) या बिंदूंमधील अंतर शोधा.

25) अंतर सूत्राचा वापर करून P(2,4) आणि Q(8,12) या बिंदूंमधील अंतर शोधा.

26) अंतर सूत्राचा वापर करून P(5,6) आणि Q(1,3) या बिंदूंमधील अंतर शोधा.

27) अंतर सूत्राचा वापर करून (-5,7) आणि (-1,3) या बिंदूंमधील अंतर शोधा.

28) अंतर सूत्राचा वापर करून A(2,6) आणि B(5,10) या बिंदूंमधील अंतर शोधा.

29) A(5,-7) आणि B(1,-3) या बिंदूंमधील अंतर शोधा.

30) P(2,-3) आणि Q(10,y) या बिंदूंमधील अंतर 10 एकके असल्यास 'y' ची किंमत शोधा.

31) (3,1) आणि (0,x) या बिंदूंमधील अंतर 5 एकके असल्यास 'x' ची किंमत शोधा.

32) दिलेल्या आलेखावरून P आणि Q या बिंदूंचे निर्देशांक शोधा आणि अंतर सूत्राचा वापर करून PQ ची लांबी शोधा.



33) (-6,10) आणि (3,-8) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला (-4,6) हा बिंदू ज्या प्रमाणात अंतर्गत विभागतो ते प्रमाण शोधा.

34) (4,-3) आणि (8,5) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला 3:1 या प्रमाणात अंतर्गत विभागणाऱ्या बिंदूचे निर्देशांक शोधा.

35) (-1,7) आणि (4,-3) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला 2:3 या प्रमाणात अंतर्गत विभागणाऱ्या बिंदूचे निर्देशांक शोधा.

36) (1,6) आणि (4,3) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला 1:2 या प्रमाणात अंतर्गत विभागणाऱ्या बिंदूचे निर्देशांक शोधा.

37) (1,-3) आणि (8,5) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला 3:1 या प्रमाणात अंतर्गत विभागणाऱ्या बिंदूचे निर्देशांक शोधा.

38) एका वर्तुळाचा केंद्रबिंदू (2,-3) असून B(1,4) हा बिंदू आहे. AB हा वर्तुळाचा व्यास असल्यास A बिंदूचे निर्देशांक शोधा.

39) A(2,4) आणि B(2,8) हे वर्तुळाच्या व्यास AB चे अंतिम बिंदू आहेत. वर्तुळाच्या केंद्राचे निर्देशांक शोधा.

40) (-5,4) केंद्र असलेले वर्तुळ (-7,1) या बिंदूतून जाते. वर्तुळाची त्रिज्या शोधा.

41) A(4,6) आणि B(x,y) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू (6,5) असल्यास B बिंदूचे निर्देशांक शोधा.

42) (1,6) आणि (4,3) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाला 3:1 या प्रमाणात अंतर्गत विभागणाऱ्या बिंदूचे निर्देशांक शोधा.

43) A$(x, 5)$ आणि B$(2, y)$ हे केंद्र P(4,3) असलेल्या वर्तुळाच्या व्यास AB चे अंतिम बिंदू आहेत. 'x' आणि 'y' ची मूल्ये शोधा. तसेच वर्तुळाच्या व्यासाची लांबी शोधा.

44) A(5,11), B(x,y), C(5,3) आणि D(2,7) हे क्रमाने एका समभुज चौकोनाचे शिरोबिंदू आहेत. B बिंदूचे निर्देशांक आणि BD या कर्णाची लांबी शोधा.



IV. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (३ गुण)

45) दिलेल्या आलेखामध्ये 'P' हा बिंदू रेषाखंड 'AB' ला ज्या प्रमाणात विभागतो ते सूत्राचा वापर करून शोधा.

46) दिलेल्या आकृतीमध्ये 'AB'  र्गत विभागणाऱ्या बिंदूचे निर्देशांक विभागणी सूत्राचा वापर करून

.

47) अंतर सूत्राचा वापर करून A(1,5), B(2,4) आणि C(9,-3) हे बिंदू एकरेषीय आहेत हे सिद्ध करा.

48) अंतर सूत्राचा वापर करून A(7,-2), B(5,1) आणि C(3,4) हे बिंदू एकरेषीय आहेत की नाही ते तपासा.

49) (5,-2), (6,4) आणि (7,-2) हे बिंदू समद्विबाहू त्रिकोणाचे शिरोबिंदू आहेत की नाही ते तपासा.

50) त्रिकोणाचे शिरोबिंदू A(8,-4), B(9,5) आणि C(0,4) आहेत. हा त्रिकोण समद्विबाहू आहे हे सिद्ध करा.

51) A(x,0) आणि B(0,y) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाचा मध्यबिंदू (4,3) आहे. AB ची लांबी शोधा.

52) (4,-1) आणि (-2,-3) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाच्या त्रिभाजन बिंदूचे निर्देशांक शोधा.

53) (2,-2) आणि (-7,4) हे बिंदू जोडणाऱ्या रेषाखंडाच्या त्रिभाजन बिंदूचे निर्देशांक शोधा.

54) A(1,-5) आणि B(-4,5) हे बिंदू जोडणारा रेषाखंड x-अक्षाने ज्या प्रमाणात विभागला आहे ते प्रमाण शोधा. तसेच विभागणी बिंदूचे निर्देशांक शोधा.

55) (x,y) हा बिंदू (3,6) आणि (-3,4) या बिंदूंपासून समान अंतरावर आहे. x आणि y यांच्यातील संबंध शोधा.

56) P(x,y) हा बिंदू A(7,1) आणि B(3,5) या बिंदूंपासून समान अंतरावर आहे. x आणि y यांच्यातील संबंध शोधा. जर A, P आणि B हे एकरेषीय असतील, तर P बिंदूचे निर्देशांक शोधा.

57) समांतरभुज चौकोनाचे तीन शिरोबिंदू A(1,2), B(2,3) आणि C(8,5) आहेत. चौथ्या शिरोबिंदूचे निर्देशांक शोधा.

58) A(1,y), B(4,3), C(x,6) आणि D[illegible]ीरोबिंदू आहेत. 'x' आणि 'y' ची मूल्ये शोधा.





59) A(4,5), B(7,y), C(4,3) आणि D(x,2) हे समांतरभुज चौकोनाचे शिरोबिंदू आहेत. 'x' आणि 'y' ची मूल्ये शोधा.



60) त्रिकोण ABC चे शिरोबिंदू A(-3,2), B(-1,-4) आणि C(5,2) आहेत. M आणि N हे अनुक्रमे AB आणि AC चे मध्यबिंदू आहेत. सिद्ध करा की: 2MN = BC.



61) त्रिकोण ABC चे शिरोबिंदू A(7,2), B(9,10) आणि C(1,4) आहेत. E आणि F हे अनुक्रमे AB आणि AC चे मध्यबिंदू आहेत. सिद्ध करा की: EF = 1/2 BC.



62) (1,7), (4,2), (-1,-1) आणि (-4,4) हे बिंदू चौरसाचे शिरोबिंदू आहेत हे सिद्ध करा.

घटक ८ : त्रिकोणमितीची ओळख

अध्ययन निष्पत्ती (LO) क्रमांक	अध्ययन निष्पत्ती	प्रश्न क्रमांक
२२	दै काटकोन त्रिकोणातील दिलेल्या लघुकोनासाठी सर्व त्रिकोणमितीय गुणोत्तरे निश्चित करणे आणि त्यांमधील संबंध ओळखणे. या गुणोत्तरांसाठी प्रमाण कोनांच्या (standard angles) किमती शोधणे.	१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८,
२३	त्रिकोणमितीय नित्यसमानता (identities) सिद्ध करणे आणि त्यांचा वापर करून विविध त्रिकोणमितीय समीकरणे सिद्ध करणे.	४९, ५०, ५१, ५२, ६८, ७०, ७२, ७३, ७४, ७६, ७७, ७८, ७९, ९९, १०० ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६९, ७१, ७५, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९८, १०१, १०२, १०३

प्रश्नांची संख्या	सोपे	मध्यम	कठीण
103	13	59	31

I. खालील प्रत्येक प्रश्नासाठी / अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत.

योग्य पर्याय निवडा आणि त्या पर्यायाचा अक्षर-क्रमांक व पूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

1. आकृतीमध्ये, cosR ची किंमत ... इतकी आहे. (LO - 22, सोपे)



A) A) $\frac{PQ}{PR}$ B) $\frac{PR}{QR}$ C) $\frac{PR}{PQ}$ D) $\frac{PQ}{QR}$

2. आकृतीमध्ये, $\frac{LN}{MN}$, = (सोपे)



A) cos L B) cot L C) cosec L D) sec L

3. आकृतीमध्ये, sinC ची किंमत ... आहे. [जुलै-२०२१: सोपे]



A)A) $\frac{2}{\sqrt{3}}$ B) $\frac{\sqrt{3}}{2}$ C) $\frac{1}{2}$ D) 1

4. जर $sin\theta = \frac{5}{13}$ असेल, तर cosecθ ची किंमत... आहे, [सोपे]

A) $\frac{13}{5}$ B) $\frac{5}{12}$ C) $\frac{13}{12}$ D) $\frac{12}{13}$

5. जर $\angle A = 30°$ असेल, तर sin2A ची किंमत... आहे, [मध्यम]

A)0 B) $\frac{1}{4}$ C) $\frac{1}{2}$ D) C) $\frac{1}{\sqrt{2}}$

6. $sin30° + cos60°$ ची किंमत... आहे, [MQP- 2020: सोपे]

A) $\frac{1}{2}$ B) $\frac{3}{2}$ C) $\frac{1}{4}$ D) 1

7. जर sinA = $\frac{1}{\sqrt{2}}$,.. असेल, तर $\angle A$ ची किंमत... आहे, [MQP- 2020: मध्यम]

A) 90^0 B) 60^0 C) 30^0 D) 45^0

8. जर$cosec\theta = \frac{5}{3}$ असेल, तर sinθ ची किंमत... आहे, [सोपे]

A) $\frac{5}{3}$ B) $\frac{3}{5}$ C) $\frac{3}{4}$ D) $\frac{5}{4}$

9. जर $13cos\theta = 12$असेल, तर secθ ची किंमत... आहे, [मध्यम]

A) $\frac{12}{5}$ B) $\frac{13}{5}$ C) $\frac{12}{13}$ D) $\frac{13}{12}$

10. $sec^2 26° - tan^2 26°$ ची किंमत... आहे, [मध्यम]

A) $\frac{1}{2}$ B) 0 C) 2 D) 1

11. $sin45° \times cos45°$ ची किंमत... आहे, [मध्यम]

A) $\frac{1}{\sqrt{2}}$ B) $\frac{\sqrt{3}}{2}$ C) $\frac{1}{4}$ D) $\frac{1}{2}$

12. $tan45° \times cot45°$ ची किंमत... आहे, [मध्यम]

A) $\sqrt{3}$ B) 2 C) 1 D) $\frac{1}{\sqrt{3}}$

13. जर $2sin2\theta = \sqrt{3}$ असेल, तर θ ची किंमत... आहे, [MQP 1] -२०२१: मध्यम]

A) 90^0 B) 60^0 C) 30^0 D) 45^0

१४. जर $sin\theta = \frac{x}{y}$, असेल तर cosθ ची किंमत आहे, [MQP १- २०२१: कठीण]

A) $\frac{y}{\sqrt{y^2-x^2}}$ B) $\frac{y}{x}$ C) $\frac{x}{\sqrt{y^2-x^2}}$ D) $\frac{\sqrt{y^2-x^2}}{y}$

१५. जर sinA + sin2A = 1, असेल तर cos2A + cos4A ची किंमत आहे, [MQP १- २०२१: कठीण]

A) $\frac{1}{2}$ B)2 C) 3 D) 1

16. जर $sin\theta = \frac{3}{5}$,, तर $(1 - cos^2\theta)$ ची किंमत आहे, [MQP-2 2021: मध्यम]

A) $\frac{9}{25}$ B) $\frac{6}{10}$ C) $\frac{9}{5}$ D) $\frac{25}{9}$

17. खालीलपैकी योग्य संबंध कोणता आहे? [July 2021: मध्यम]

A) $tan^2\theta = sec^2\theta + 1$ B) $sin\theta = \frac{1}{Sec\theta}$

C) $cot\theta = \frac{Sin\theta}{Cos\theta}$ D) $sin^2\theta + cos^2\theta = 1$

18. (sin 30° + cos 60° - tan 45°) ची किंमत आहे, [July 2021: मध्यम]

A) 0 B) – 1 C) 2 D) 1

19. $(3 + sec^2 A)$ हे ... च्या बरोबरीचे आहे, [July- 2021: मध्यम]

A) $4 + tan^2 A$ B) $4 + cot^2 A$ C) $2 + cot^2 A$ D) $3 + cot^2 A$

20. (sin A × cosec A) ची किंमत आहे, [July- 2021: मध्यम]

A) 2 B) 1 C) $-\frac{1}{2}$ D) $\frac{\sqrt{3}}{2}$

21. $(1 + tan^2\theta)$ हे ... च्या बरोबरीचे आहे, [June- 2022: मध्यम]

A) $cosec^2\theta$ B) $cos^2\theta$ C) $sec^2\theta$ D) $cot^2\theta$

22. $(sec^2\theta - 1)(1 - cosec^2\theta)$ हे ... च्या बरोबरीचे आहे, [कठीण]

A) – 1 B) $cot\theta$ C) 0 D) $cosec\theta$

23. $cot^2\theta - \frac{1}{Sin^2\theta}$ हे ... च्या बरोबरीचे आहे, [मध्यम]

A) – 1 B) 1 C) $sin^2\theta$ D) $cos^2\theta$

24. जर (sec A - tan A) = k, तर (sec A + tan A) हे ... च्या बरोबरीचे आहे, [मध्यम]

A) $1 - \frac{1}{k}$ B) 1 – k C) 1 + k D) $\frac{1}{k}$

25. जर 8tan P = 15, तर sin P - cos P ची किंमत किती असेल? [, मध्यम]

A) $\frac{8}{17}$ B)$\frac{17}{8}$ C) $\frac{1}{17}$ D) $\frac{7}{17}$

26. जर $\tan^2\theta = \frac{8}{7}$ (येथे θ हा लघुकोन आहे), तर $\frac{(1+sin\theta)(1-sin\theta)}{(1+cos\theta)(1-cos\ )}$ ची किंमत किती असेल? [कठीण]

A) $\frac{8}{7}$ B)$\frac{7}{8}$ C) $\frac{7}{4}$ D) $\frac{64}{49}$

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (१ गुण)

27. ΔABC मध्ये, जर $\angle$ABC = 90° आणि $\angle$ACB = 30° असेल, तर AB:AC काढा. [जून 2019: कठीण]

28. जर $sin\theta = \frac{3}{5}$. आणि $cos\theta = \frac{4}{5}$, असेल, तर $sin^2\theta + cos^2\theta$ ची किंमत काढा. [MQP 1 2020: मध्यम]

29. cosec60° + sec30° ची किंमत काढा. [सोपे]

30. sin90° + tan45° ची किंमत काढा. [MQP 2 2020: मध्यम]

31. ΔABC मध्ये, जर AB $\perp$ BC, $\angle$ACB = 30° आणि AB = 15m असेल, तर BC चे माप काढा. [SLP 2020: कठीण]

32. tan45° + cot45° ची किंमत काढा. [LO - 22, जून 2020: सोपे]

33. जर $cos\theta = \frac{24}{25}$असेल, तर $sec\theta$. ची किंमत काढा. [सप्टेंबर 2020: सोपे]

34. जर sin2A = 0 असेल, तर cosA ची किंमत काढा. [सप्टेंबर 2020: सोपे]

35. जर $15\cot A = 8$ असेल, तर $\tan A$ ची किंमत काढा. [मध्यम]

36. आकृतीमध्ये, ABC हा काटकोन त्रिकोण आहे. जर $\angle C = 30°$ आणि $AB = 12cm$ असेल, तर AC चे माप काढा. [LO - 22, जून 2022: मध्यम]



37. जर $x \tan 45° \cdot \sin 30° = \cos 30° \cdot \tan 30°$, असेल, तर x ची किंमत काढा. [मध्यम]



38. $5 \tan^2 A - 5 \sec^2 A + 1$ ची किंमत काढा. [कठीण]

39. $\sin A \cdot \operatorname{cosec} A$ ची किंमत काय आहे? [मध्यम]

40. $\tan A \cdot \cot A - \cos A \cdot \sec A$ ची किंमत काय आहे? [कठीण]

41. $\tan^2 45° - \sin^2 30°$ ची किंमत काढा. [मध्यम]

42. जर $\sin A = \cos A$ असेल, तर A ची किंमत काय आहे? [मध्यम]

III. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (2 गुण)

43. जर $\sin \theta = \frac{12}{13}$ आणि $\cos \theta = \frac{5}{13}$ असेल, तर $\sec \theta$ आणि $\tan \theta$ ची किंमत काढा. [सोपे]

44. जर $\operatorname{cosec}\theta = \frac{13}{12}$ आणि $\tan\theta = \frac{5}{12}$ असेल, तर $\cos\theta$ ची किंमत काढा. [मध्यम]

45. शेजारील आकृतीमध्ये, $\sin\propto$ आणि $\cos\propto$ ची किंमत काढा. [मध्यम]



46. आकृतीमध्ये, $\sin P$ आणि $\tan R$ ची किंमत काढा. [SLP 2023: सोपे]



47. आकृतीमध्ये, $\tan P - \cot R$ ची किंमत काढा. [LO - 22, मध्यम]



48. आकृतीमध्ये, ∠ABC = 90° आहे. खालील गुणोत्तरांच्या किमती लिहा. [मार्च 2025: सोपे]

i) $sin\alpha$

ii) $tan\theta$



48. आकृतीमध्ये, $\sin\propto + \cos\theta$ ची किंमत काढा. [मध्यम]



50. जर $sin\ A = \frac{3}{5}$ असेल, तर tan A ची किंमत काढा. [मध्यम]

51. किंमत काढा: $2\tan^2 45° + \cos^2 30° - \sin^2 60°$ [MQP 2019: मध्यम]

52. जर $\sqrt{3}\tan\theta = 1$ आणि θ हा लघुकोन असेल, तर $\sin 3\theta + \cos 2\theta$ ची किंमत काढा. [एप्रिल 2023: मध्यम]

53. सिद्ध करा की $(\tan A \times \sin A) + \cos A = \sec A$. . [जून 2019: मध्यम]

54. जर $\cos\theta = 0.6$ असेल, तर सिद्ध करा की $5\sin\theta - 3\tan\theta = 0$. [MQP 2020: कठीण]

55. सिद्ध करा की $(\sec^4\theta - \sec^2\theta) = \tan^2\theta + \tan^4\theta$. [MQP 2020: कठीण]

56. सिद्ध करा की $\text{cosecA}\ (1 - \text{cosA})\ (\text{cosecA} + \text{cotA}) = 1$. [सप्टेंबर 2020: कठीण]

57. सिद्ध करा की $\tan^2\theta - \sin^2\theta = \tan^2\theta \cdot \sin^2\theta$. [कठीण]

58. सिद्ध करा की $\cot^2\theta - \cos^2\theta = \cot^2\theta \cdot \cos^2\theta$. [कठीण]

59. सिद्ध करा की $\sin 30° + \cos 60° + \tan 45° = \sec 60°$. [मध्यम]

६०. सिद्ध करा की $\frac{sin30^0+cos60^0}{cosec30^0-cos45^0} = sin90^0$. [एप्रिल २०२४: मध्यम]

61. किंमत काढा: $\frac{cos45^0.\ sin45^0}{sec30^0-cot60^0}$ [मध्यम]

62. सिद्ध करा की $\frac{1+cosA}{1-cosA} = (cosecA+cotA)^2$ [एप्रिल 2019: मध्यम]

63. सिद्ध करा की $\frac{1+sinA}{1-sinA} = (secA+tanA)^2$ [कठीण]

64. सिद्ध करा की $\frac{cosA}{1+sin} + \frac{1+sinA}{cosA} = 2secA$ [एप्रिल 2025: मध्यम]

65. सिद्ध करा की $\frac{sinA}{1+cosA} + \frac{1+cos}{sinA} = 2cosecA$ [मध्यम]

66. सिद्ध करा की $\frac{cosA-sinA.cosA}{cosA+sinA.cosA} = \frac{cosecA-1}{cosecA+1}$ [एप्रिल 2024: मध्यम]

67. सिद्ध करा की sin30° • cos60° + cos30° • sin60° = sin90° [जुलै 2024: मध्यम]

68. जर $\frac{\sqrt{3}SecA}{CosecA} = 1$ तर A ची किंमत काढा. [जुलै 2024: मध्यम]

69. सिद्ध करा की secA (1- sinA) (secA + tanA) = 1 [कठीण]

70. जर 2sin θ = 1, तर cos²60° + sec²30° ची किंमत काढा. [मध्यम]

71. सिद्ध करा की tan² θ + cot² θ = sec² θ + cosec² θ - 2 [कठीण]

72. किंमत काढा: 4sin30° + cos60° • sec60° - 3tan45° . [मध्यम]

73. किंमत काढा: 6cos60° - sin30° + sin²45° + cos²45° . [मध्यम]

74. किंमत काढा :$\frac{5cos^260+4sec^230-tan^245}{sin30^0+co^{\ 0}}$ [मार्च 2025: मध्यम]

75. सिद्ध करा की $\frac{sec60^0}{cot45^0} - \frac{2sin90^0}{cos\ 0^0} + \frac{tan45^0}{cosec30^0} = \frac{1}{2}$ [मध्यम]

76. जर $ssin\theta = \frac{1}{3}, i$ असेल तर (2cot²+ 2) ची किंमत काढा [मध्यम]

77. $2cos^2\theta + \frac{2}{1+cot^2\theta}co$ ची किंमत काढा (कठीण]

78. ची किंमत काढा $\frac{5}{cot^2\theta} - \frac{5}{cos^2\theta}$ [कठीण]

79. जर sec²A(1+sinA)(1-sinA) = k असेल, तर 'k' ची किंमत काढा [मध्यम]

IV. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (3 गुण)

80. सिद्ध करा की $\frac{sinA}{1-cotA} + \frac{cosA}{1-tan} = sinA + cosA.$. [MQP 1 2021: कठीण]

81. सिद्ध करा की $\frac{1+cos}{sinA} - \frac{sinA}{1+cosA} = 2cotA.$ [SLP 2020: मध्यम]

82. सिद्ध करा की $\frac{1+sinA}{cosA} - \frac{cosA}{1+sin} = 2tanA.$ [मध्यम]

83. सिद्ध करा की $\frac{cos\theta-2co\ ^3\theta}{2si\ ^3\theta-sin\theta} = cot\theta.$ [MQP 1 2021: कठीण]

84. सिद्ध करा की$\frac{sin\theta-2sin^3\theta}{2cos^3\theta-cos} = tan\theta.$. [कठीण]

85. सिद्ध करा की.. $\frac{sinA-cosA}{sinA+cosA} + \frac{sinA+cos}{sinA-cos} = \frac{2}{2sin^2A-1}$. [MQP 2 2021: कठीण]

86. जर $x = p \tan\theta + q \sec\theta$ आणि $y = p \sec\theta + q \tan\theta$, तर सिद्ध करा की $x^2 - y^2 = q^2 - p^2$. [जून 2020: कठीण]

87. सिद्ध करा की $(\sec\theta - \cos\theta)\{(\operatorname{cosec}\theta - \sin\theta)(\tan\theta + \cot\theta)\} = 1$. [MQP-2 2021: कठीण]

88. सिद्ध करा की. . $\frac{secA+tanA-}{tanA-secA+} = \frac{1+sin}{cosA}$. [जून 2024: कठीण]

89. सिद्ध करा की. $\frac{sin\theta}{1-cos\theta} + \frac{tan\theta}{1+cos\theta} = cot\theta + sec\theta.cosec\theta.$ .. [कठीण]

90. सिद्ध करा की. $\frac{tanA-sinA}{tanA+sinA} = \frac{secA-1}{secA+1}$ .. [कठीण]

91. सिद्ध करा की $(\sin A + \operatorname{cosec} A)^2 + (\cos A + \sec A)^2 = 7 + \tan^2 A + \cot^2 A$. [MQP1 2024: मध्यम]

92. सिद्ध करा की $\sec\theta(1 - \sin\theta)(\sec\theta + \tan\theta) = 1$. [मार्च 2022: मध्यम]

93. सिद्ध करा की $\operatorname{cosec} A(1 - \cos A)(\operatorname{cosec} A + \cot A) = 1$. [मध्यम]

94. सिद्ध करा की $(\operatorname{cosec} A - \sin A)(\sec A - \cos A) = \frac{1}{tanA+cotA}$ [कठीण]

95. सिद्ध करा की $\sqrt{\frac{1+cosA}{1-cos}} = cosecA + cotA$.. [एप्रिल 2023: मध्यम]

96. सिद्ध करा की $\sqrt{\frac{1+sin}{1-sinA}} = secA + tanA$.[मध्यम]

97. सिद्ध करा की $(\sec A - \cos A)(\cot A + \tan A) = \tan A.\sec A$. [जून २०२३: मध्यम]

९८. सिद्ध करा की $(\operatorname{cosec} A - \sin A)(\tan A + \cot A) = \cot A.\operatorname{cosec} A$. [, मध्यम]

९९. जर $an\theta = \sqrt{3}$, , तर $\frac{4sin\theta-cos\theta-1}{4sin\theta+cos\theta+}$. याची किंमत काढा [कठीण]

१००. किंमत काढा : $\frac{2cos(90^0-30^0)+tan45^0-\sqrt{3}cosec60^0}{\sqrt{3}sec\ \ ^0+2c\ \ \ ^0+co\ \ ^0}$ [जून २०२२: कठीण]

१०१. सिद्ध करा की $\frac{cos^3\theta+sin^3\theta}{cos\theta+sin} + \frac{cos^3\theta-sin^3\theta}{cos\theta-sin} = 2$ [, कठीण]

१०२. सिद्ध करा की: $ssec\ A\ (1 - sin\ A)\ (sec\ A + tan\ A)\ (\sqrt{(\mathbf{1} + \boldsymbol{cos\ A})(\mathbf{1} - \boldsymbol{cos\ A})})$ cosecA [मध्यम]

१०३. सिद्ध करा की $\frac{sin\theta}{1-cos\theta} + \frac{tan\theta}{1+cos} = cot\theta + sec\theta.cosec\theta$ [मध्यम]

९: त्रिकोणमितीचे काही उपयोग

अध्ययन निष्पत्ती (LO) क्रमांक	अध्ययन निष्पत्ती	प्रश्न क्रमांक
२४	दैनंदिन जीवनातील उंची आणि अंतराशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी त्रिकोणमितीय गुणोत्तरे आणि कोनांचा वापर करणे.	१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९

प्रश्नांची संख्या	सोपे	मध्यम	कठीण
४९	११	१९	१९

I. खालील प्रत्येक प्रश्न किंवा अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा आणि तो पर्याय दर्शविणाऱ्या अक्षरासह पूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

१. सपाट जमिनीवर असलेल्या एका मनोऱ्याच्या (tower) सावलीची लांबी ही त्या मनोऱ्याच्या उंचीच्या $\sqrt{3}$ पट आहे. तर सूर्याचा उन्नत कोन (angle of elevation) किती असेल? (सोपे)

A) 45° B) 30° C) 60° D) 90°

२. जर ६ मीटर उंचीच्या मनोऱ्याची जमिनीवर पडणाऱ्या सावलीची लांबी $२\sqrt{३}$ मीटर असेल, तर सूर्याचा उन्नत कोन (angle of elevation) किती असेल? (सोपे)

A) ६०° B) ४५° C) ९०° D) ३०°

३. एका मनोऱ्याची उंची आणि जमिनीवरील त्याची सावली यांची लांबी यांचे गुणोत्तर $\sqrt{३} : १$ आहे. तर सूर्याचा उन्नत कोन (angle of elevation) किती असेल? (सोपे)

A) ३०° B) ४५° C) ६०° D) ७५°

४. दिवसाच्या एखाद्या वेळी, जर एका मनोऱ्याच्या सावलीची लांबी त्याच्या उंचीइतकी असेल, तर सूर्याचा उन्नत कोन (angle of elevation) किती असतो? (सोपे)

A) ३०° B) ६०° C) ९०° D) ४५°

५. 'O' केंद्र असलेल्या वर्तुळात, AC ही 'A' बिंदूपाशी असलेली स्पर्शिका आहे. जर OC = ४ सेमी आणि $\angle ACO = ३०°$ असेल, तर त्या वर्तुळाची त्रिज्या...

A) $\sqrt{3}\ cm$ B) $4\sqrt{3}\ cm$ C) $2\ cm$ D) $3\ cm$



[MQP २०२१ कठीण]

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (१ गुण)

6. इमारतीच्या पायथ्यापासून १० मीटर अंतरावर उभी असलेली व्यक्ती त्या इमारतीचे शिखर ४५° च्या कोनातून पाहते. तर त्या इमारतीची उंची काढा. (सोपे)

7. जेव्हा दृष्टीरेषा क्षितिजसमांतर पातळीच्या वर असते, तेव्हा दृष्टीरेषा आणि क्षितिजसमांतर रेषा यांच्यामध्ये तयार होणाऱ्या कोनाचे नाव लिहा. (सोपे)

8. जेव्हा दृष्टीरेषा क्षितिजसमांतर पातळीच्या खाली असते, तेव्हा दृष्टीरेषा आणि क्षितिजसमांतर रेषा यांच्यामध्ये तयार होणाऱ्या कोनाचे नाव लिहा. (सोपे)

९. भिंतीला टेकवून ठेवलेली एक शिडी जमिनीशी ६०° चा कोन करते. जर शिडीचा तळ भिंतीपासून ६ मीटर अंतरावर असेल, तर शिडीची लांबी काढा. (सोपे)

१०. दिवसाच्या एका विशिष्ट वेळी, जर झाडाची उंची आणि त्याच्या सावलीची लांबी समान असेल, तर सूर्याचा उन्नत कोन (angle of elevation) काढा. (सोपे)

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (२ गुण)

११. मनोऱ्याच्या पायथ्यापासून ३० मीटर अंतरावर असलेल्या जमिनीवरील एका बिंदूपासून मनोऱ्याच्या शिखराचा उन्नत कोन ३० आहे. तर मनोऱ्याची उंची काढा. (MQP २०१९, सोपा)



aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

१२. सपाट जमिनीवरील एका उभ्या मनोऱ्याच्या पायथ्यापासून त्याच जमिनीवर $9\sqrt{3}$ मीटर अंतरावर असलेल्या एका बिंदूपासून त्याच्या शिखराचा उन्नत कोन ६०° आहे. मनोऱ्याची उंची शोधा.

(MQP 2019, सोपे)



१३. एका लंबवृत्तीय शंकूच्या वर्तुळाकार तळाचा व्यास शोधा, ज्याची तिरकस उंची ८ सेमी आणि अर्ध-शिरोकोन ६०° आहे. (MQP २०२०, मध्यम काठिन्य पातळी)



१४. जमिनीवर उभी असलेली एक व्यक्ती ४०√ मीटर उंचीच्या पवनचक्कीच्या शिखराकडे ३०° च्या उन्नत कोनातून पाहते. तर त्या व्यक्तीमधील आणि पवनचक्कीच्या तळातील अंतर काढा. (सरासरी)



15. 50√ मीटर उंचीच्या इमारतीच्या वरच्या टोकावरून एक व्यक्ती जमिनीवरील एका वस्तूचे निरीक्षण करते, तेव्हा अवनत कोन (angle of depression) 60° असतो. तर इमारतीपासून त्या वस्तूचे अंतर काढा.

(MQP 2020, मध्यम काठिन्य पातळी)



IV. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (३/४ गुण)

१६. एका मैदानावर ५० मीटर आणि ४०√३ मीटर उंचीचे दोन पवनचक्क्यांचे मनोरे (windmills) समोरासमोर उभे आहेत. त्या दोघांच्या मधील एका बिंदूवरून एक व्यक्ती त्या मनोऱ्यांची शिखरे पाहते. तेव्हा आढळलेले उन्नत कोन (angles of elevation) अनुक्रमे ४५° आणि ३०° आहेत. तर त्या दोन मनोऱ्यांमधील अंतर काढा. (जून २०१९, मध्यम काठिन्य पातळी)

१७. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दोन उभे खांब आहेत. रस्त्याची रुंदी ९० फूट आहे आणि खांबांच्या उंचीचे गुणोत्तर १:२ आहे. रस्त्यावरील त्यांच्यामधील एका बिंदूपासून खांबांच्या शिखरांकडे पाहताना होणारा उन्नत कोन ६०° आहे. तर खांबांची उंची काढा. (SLP २०२०, मध्यम काठिन्य पातळी)



१८. जमिनीवरील एका बिंदूपासून, २० मीटर उंच इमारतीच्या शिखरावर बसवलेल्या पारेषण मनोऱ्याच्या शिखराचे आणि तळाचे उन्नयन कोन अनुक्रमे ६००° आणि ४५०° आहेत. पारेषण मनोऱ्याची उंची शोधा. (MQP-1 २०२१, सरासरी)



१९. एकाच सपाट जमिनीवर एक मनोरा आणि एक इमारत उभी आहेत. मनोऱ्याच्या पायथ्यापासून इमारतीच्या शिखराचा उन्नत कोन ३०° आहे आणि इमारतीच्या पायथ्यापासून मनोऱ्याच्या शिखराचा उन्नत कोन ६०° आहे. जर मनोऱ्याची उंची ५० मीटर असेल, तर इमारतीची उंची काढा. (MQP २०२२, मध्यम काठिन्य पातळी)



२०. एक केबल टॉवर आणि एक इमारत एकाच सपाट जमिनीवर सरळ रेषेत उभे आहेत. ७ मीटर उंच असलेल्या इमारतीच्या शिखरावरून, केबल टॉवरचा उन्नयन कोन ६००° आहे आणि त्याच्या पायाचा अवनयन कोन ४५०° आहे. टॉवरची उंची शोधा.

(जून २०२२, सरासरी)



२१. एक मनोरा आणि एक खांब एकाच सपाट जमिनीवर उभे आहेत. असे दिसून येते की, ६० मीटर उंचीच्या मनोऱ्याच्या शिखरापासून खांबाच्या टोकाचा आणि पायाचा अवनत कोन अनुक्रमे ३००° आणि ६००° आहे. खांबाची उंची शोधा.

(जून २०२०, सरासरी)



२२. आकाशात जमिनीला समांतर उडणारे एक विमान बिंदू A पासून बिंदू B पर्यंत जाताना पाहिले जाते. जमिनीवरील एका बिंदूवरून पाहिल्यास, बिंदू A पाशी विमानाचा उन्नत कोन (angle of elevation) ६०° आढळतो; १० सेकंदांनंतर त्याच बिंदूवरून पाहिल्यास बिंदू B पाशी विमानाचा उन्नत कोन ३०° असल्याचे दिसून येते. जर विमानाचा वेग ताशी ६४८ किमी असेल, तर विमान किती उंचीवर उडत आहे ते शोधा. ($\sqrt{3}$ = १.७३ घ्या) (सप्टेंबर २०२०, मध्यम काठिन्य पातळी)



२३. आकृतीत दर्शविल्याप्रमाणे, एका उभ्या मनोऱ्याच्या शिखरावरून जमिनीवरील एका बिंदूकडे पाहताना होणारा अवनत कोन (angle of depression) ६०° आहे आणि मनोऱ्याच्या तळापासून ५० मीटर उंचीवरील एका बिंदूवरून त्याच बिंदूकडे पाहताना होणारा अवनत कोन ३०° आहे. तर मनोऱ्याची उंची काढा.

(MQP २०२२, मध्यम काठिन्य पातळी)



24. जमिनीवरील एक इमारत शंकूच्या आकाराच्या कबरीच्या स्वरूपात आहे, ज्यावर आकृतीत दाखवल्याप्रमाणे 10 फूट उंचीचा एक दंडगोल आहे. त्याच जमिनीवरील P या बिंदूपासून, दंडगोलाच्या वरच्या कडेचा उन्नत कोन 300° आणि शंकूच्या शिरोबिंदूचा उन्नत कोन 450° आढळतो. जर दंडगोलाच्या वर्तुळाकार तळाच्या बाहेरील कडेचा व्यास 9.4 फूट असेल, तर शंकूच्या आकाराच्या कबरीची उंची काढा. (LO - 24, SLP 2022, सरासरी)



२५. एका मनोऱ्याच्या पायथ्यापासून इमारतीच्या शिखराचा उन्नत कोन ३०° आहे आणि इमारतीच्या पायथ्यापासून मनोऱ्याच्या शिखराचा उन्नत कोन ६०° आहे. मनोरा आणि इमारत एकाच पातळीवर आहेत. जर मनोऱ्याची उंची ५० मीटर असेल, तर इमारतीची उंची काढा.
(एप्रिल २०२२, मध्यम काठिन्य पातळी)



२६. समुद्रसपाटीपासून ७५ मीटर उंच असलेल्या दीपगृहाच्या (lighthouse) शिखरावरून पाहिल्यास, दोन जहाजांचे अवनत कोन (angles of depression) अनुक्रमे ३०° आणि ४५° आढळतात. जर दोन्ही जहाजे दीपगृहाच्या एकाच बाजूला आणि एकामागे एक असतील, तर त्या दोन जहाजांमधील अंतर काढा.

(MQP २०२३, एप्रिल २०२० – मध्यम काठिन्य पातळी)



२७. जमिनीवर उभ्या असलेल्या एका इमारतीच्या शिखरावरून पाहिल्यास, जमिनीवरील 'C' या बिंदूचा अवनत कोन (angle of depression) ६०° आहे. इमारतीच्या पायापासून ('B' पासून) 'C' बिंदूतून सरळ रेषेत पुढे जाऊन 'P' या बिंदूवरून इमारतीचे शिखर पाहिल्यास, जर उन्नत कोन (angle of elevation) ३०° होत असेल (आकृतीत दर्शविल्याप्रमाणे), तर 'C' पासून 'P' पर्यंत कापलेले अंतर हे 'BC' या अंतराच्या दुप्पट आहे, हे सिद्ध करा. (MQP २०२३, मध्यम काठिन्य पातळी)



२८. एका सपाट जमिनीवर एक मनोरा आणि एक इमारत उभी आहेत. जमिनीवरील एका बिंदूवरून आणि इमारतीवरून मनोऱ्याच्या शिखराचे उन्नत कोन (angles of elevation) अनुक्रमे ३०° आणि ६०° असल्याचे आढळते. जर त्या बिंदूचे मनोऱ्याच्या तळापासूनचे अंतर ३०√३ मीटर असेल आणि इमारतीची उंची १० मीटर असेल, तर मनोऱ्याचा तळ व इमारत यांच्यातील अंतर आणि त्यांच्या शिखरांमधील अंतर शोधा.

(SLP २०२३, मध्यम काठिन्य पातळी)



२९. दिलेल्या आकृतीत, एका उभ्या खांबाच्या टोकापासून जमिनीवरील एका खुंटीपर्यंत एक दोर घट्ट ताणून बांधला आहे. या दोराची लांबी २० मीटर असून त्याने जमिनीशी केलेला कोन ३०° आहे. एक सर्कसचा कलाकार त्या दोरावरून चढून खांबाच्या टोकापर्यंत पोहोचतो आणि तिथून त्याला त्याच जमिनीवर असलेल्या दुसऱ्या एका खांबाचे टोक ६०° च्या उन्नत कोनात (angle of elevation) दिसते. जर लांब खांबाचा तळ आणि खुंटी यांमधील अंतर ३० मीटर असेल, तर त्या खांबाची उंची काढा. ($\sqrt{}$ = १.७३ घ्या) (एप्रिल २०२३, कठीण)



३०. १.२ मीटर उंचीची एक मुलगी जमिनीपासून ८८.२ मीटर उंचीवर वाऱ्याच्या दिशेने क्षितिजसमांतर रेषेत जाणारा एक फुगा पाहते. कोणत्याही एका क्षणी त्या मुलीच्या डोळ्यांपासून फुग्याचा उन्नत कोन ६०° असतो. काही काळानंतर तो उन्नत कोन कमी होऊन ३०° होतो (आकृती पहा). या कालावधीत फुग्याने कापलेले अंतर शोधा. (जून २०२३, मध्यम काठिन्य पातळी)



३१. Δ ABC मध्ये, AD $\perp$ BC. जर $\angle$ABC = ६०° , $\angle$ACB = ३०° आणि BC = ३६ सेमी असेल, तर AB, AC आणि AD यांची मापे काढा. (MQP २०२४, मध्यम काठिन्य पातळी)



३२. आकृतीमध्ये, वेगवेगळ्या उंचीचे AB आणि CD हे खांब सपाट जमिनीवर उभे आहेत. खांबांच्या तळांना जोडणाऱ्या रेषेवरील P या बिंदूपासून खांबांच्या शिखरांकडे पाहताना होणारा उन्नत कोन (angle of elevation) विचारात घ्या. CD ची उंची आणि PD हे अंतर अनुक्रमे $20\sqrt{3}$ मीटर आणि २० मीटर आहे. जर BP हे अंतर १० मीटर असेल, तर खांब AB ची उंची आणि खांबांच्या शिखरांमधील अंतर AC काढा.

(कठीण)



३३. आकृतीत दर्शविल्याप्रमाणे, क्षितिजसमांतर जमिनीच्या वर 'A' आणि 'B' हे दोन पतंग एकाखाली एक उडत आहेत. पतंग 'A' जमिनीपासून ३०० मीटर उंचीवर उडत आहे. जमिनीवरील 'P' या बिंदूवरून पाहिल्यास पतंग 'A' आणि 'B' चे उन्नत कोन (angles of elevation) अनुक्रमे ६०° आणि ३०° आहेत. त्या दोन पतंगांमधील अंतर (AB) काढा. काही काळानंतर, जेव्हा पतंग 'A' चा दोरा सोडला जातो, तेव्हा तो जमिनीला समांतर दिशेने सरकतो आणि आकाशातील 'A1' या बिंदूवर पोहोचतो. जर P, B आणि A1 हे बिंदू एकाच रेषेत असतील, तर त्या पतंगांमधील अंतर (A1B) काढा. (LO - २४, जून २०२४, कठीण)



३४. सपाट जमिनीवर ३०० मीटर अंतरावर दोन उभे मनोरे आहेत. जमिनीपासून काही उंचीवर हेलिकॉप्टरमध्ये असलेला एक सैनिक त्या मनोऱ्यांची शिखरे पाहतो आणि त्याला आकृतीत दर्शविल्याप्रमाणे अवनत कोन (angles of depression) अनुक्रमे ६०° आणि ३०° असल्याचे आढळते. जर उंच मनोऱ्याची उंची ५०० मीटर असेल आणि बुटक्या मनोऱ्याचा तळ व हेलिकॉप्टरपासून जमिनीवर टाकलेल्या लंबाचा तळ (पाया) यांच्यातील अंतर १०० √३ मीटर असेल, तर बुटक्या मनोऱ्याची उंची काढा.



(परीक्षा-३ २०२४, कठीण)

३५. एका सपाट जमिनीवर एक खांब आणि एक मनोरा उभे आहेत. खांबाची उंची ६ मीटर आहे आणि मनोऱ्याच्या तळापासून खांबाच्या टोकाचा उन्नत कोन ३०° आहे. आकृतीत दर्शविल्याप्रमाणे, खांबाच्या टोकापासून मनोऱ्याच्या टोकाचा उन्नत कोन ६०° आहे. तर मनोऱ्याची उंची (CD) काढा. तसेच, खांबाचे टोक आणि मनोऱ्याचे टोक यांमधील अंतर (AC) काढा. (एप्रिल २०२५, काठिन्य पातळी: कठीण)



३६. समुद्रकिनाऱ्यावर १०√३ मीटर उंचीचा एक दीपगृह [AB] उभा आहे. दीपगृहाच्या तळापासून अनुक्रमे ३० मीटर आणि १० मीटर अंतरावर एक मनोरा [CE] आणि एक जहाज [F] उभे आहेत. दीपगृहाच्या शिखरावरून मनोऱ्याच्या शिखराकडे पाहताना होणारा उन्नत कोन (angle of elevation) ३०° आहे. मनोऱ्याची उंची आणि दीपगृहाचे शिखर व मनोऱ्याचे शिखर यांमधील अंतर [AE] काढा. तसेच, दीपगृहाच्या शिखरावरून जहाजाकडे पाहताना होणारा अवनत कोन (angle of depression) काढा. (कठीण)



३७. जमिनीवरील P या बिंदूपासून १० मीटर उंच इमारतीच्या शिखराचा उन्नत कोन ३०° आहे. इमारतीच्या शिखरावर एक ध्वज फडकवला आहे आणि P या बिंदूपासून ध्वजस्तंभाच्या टोकाचा उन्नत कोन ४५° आहे. ध्वजस्तंभाची उंची आणि P या बिंदूपासून इमारतीचे अंतर काढा. (√ = १.७३२ घ्या) [कठीण]



३८. सपाट जमिनीवर उभ्या असलेल्या एका मनोऱ्याची सावली, सूर्याची उन्नत कोन (altitude) ६०° असतानाच्या सावलीपेक्षा ३०° असताना ४० मीटरने अधिक लांब असल्याचे आढळते. तर त्या मनोऱ्याची उंची काढा. [कठीण]



aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

39. एका बहुमजली इमारतीच्या शिखरावरून, 8 मीटर उंच असलेल्या इमारतीच्या शिखराचे आणि तळाचे अवनत कोन (angles of depression) अनुक्रमे 30° आणि 45° आहेत. तर त्या बहुमजली इमारतीची उंची आणि दोन्ही इमारतींमधील अंतर शोधा. [कठीण]



40. नदीवरील पुलाच्या एका बिंदूवरून, नदीच्या विरुद्ध बाजूंना असलेल्या तीरांचे अवनत कोन अनुक्रमे 30° आणि 45° आहेत. जर पूल तीरांपासून 3 मीटर उंचीवर असेल, तर नदीची रुंदी शोधा.

४१. एक कंत्राटदार उद्यानात मुलांच्या खेळण्यासाठी दोन घसरगुंड्या बसवण्याची योजना आखत आहे. ५ वर्षांखालील मुलांसाठी, तिला अशी घसरगुंडी हवी आहे जिचे टोक १.५ मीटर उंचीवर असेल आणि जमिनीशी ३०° चा कोन असेल, तर मोठ्या मुलांसाठी, तिला ३ मीटर उंचीची आणि जमिनीशी ६०° चा कोन असलेली एक तीव्र घसरगुंडी हवी आहे. प्रत्येक बाबतीत घसरगुंडीची लांबी किती असावी?[अवघड]



42. 1.5 मीटर उंच असलेला एक मुलगा 30 मीटर उंच इमारतीपासून काही अंतरावर उभा आहे. जेव्हा तो इमारतीच्या दिशेने चालत जातो, तेव्हा त्याच्या डोळ्यांपासून इमारतीच्या शिखराचा उन्नत कोन 30° वरून 60° पर्यंत वाढतो. त्याने इमारतीच्या दिशेने कापलेले अंतर शोधा. [LO - 24, कठीण]



43. जमिनीवरील एका बिंदूपासून, 20 मीटर उंच इमारतीच्या माथ्यावर बसवलेल्या ट्रान्समिशन टॉवरच्या तळाचा आणि शिखराचा उन्नत कोन अनुक्रमे 45° आणि 60° आहे. टॉवरची उंची शोधा. [कठीण]



44. एका चौथऱ्याच्या (pedestal) वर 1.6 मीटर उंच पुतळा उभा आहे. जमिनीवरील एका बिंदूपासून पुतळ्याच्या शिखराचा उन्नत कोन 60° आहे आणि त्याच बिंदूपासून चौथऱ्याच्या वरच्या भागाचा उन्नत कोन 45° आहे. चौथऱ्याची उंची शोधा. [कठीण]



45. एका मनोऱ्याच्या (tower) पायथ्यापासून एका इमारतीच्या शिखराचा उन्नत कोन 30° आहे आणि इमारतीच्या पायथ्यापासून मनोऱ्याच्या शिखराचा उन्नत कोन 60° आहे. जर मनोऱ्याची उंची 50 मीटर असेल, तर इमारतीची उंची काढा. [कठीण]



46. 80 मीटर रुंदीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना समसमान उंचीचे दोन खांब समोरासमोर उभे आहेत. रस्त्यावरील त्यांच्यामधील एका बिंदूपासून त्या खांबांच्या शिखरांचे उन्नत कोन अनुक्रमे 60° आणि 30° आहेत. खांबांची उंची आणि त्या बिंदूचे खांबांपासूनचे अंतर काढा. [कठीण]



47. एका कालव्याच्या काठावर टीव्हीचा मनोरा उभा आहे. मनोऱ्याच्या अगदी समोरच्या दुसऱ्या काठावरील एका बिंदूपासून मनोऱ्याच्या शिखराचा उन्नत कोन $60°$ आहे. या बिंदूला मनोऱ्याच्या पायथ्याशी जोडणाऱ्या रेषेवर, या बिंदूपासून 20 मीटर अंतरावर असलेल्या दुसऱ्या बिंदूपासून मनोऱ्याच्या शिखराचा उन्नत कोन $30°$ आहे. मनोऱ्याची उंची आणि कालव्याची रुंदी काढा. [कठीण]



48. समुद्रसपाटीपासून 75 मीटर उंच असलेल्या दीपगृहाच्या (lighthouse) शिखरावरून पाहिल्यास, दोन जहाजांचे अवनत कोन (angles of depression) अनुक्रमे $30°$ आणि $45°$ असल्याचे आढळते. जर दोन्ही जहाजे दीपगृहाच्या एकाच बाजूला आणि एकमेकांच्या अगदी मागे असतील, तर त्या दोन जहाजांमधील अंतर काढा. [कठीण]



49. एक सरळ महामार्ग एका मनोऱ्याच्या (tower) पायथ्यापर्यंत जातो. मनोऱ्याच्या शिखरावर उभा असलेला एक माणूस एका कारला $30°$ च्या अवनत कोनातून पाहतो; ही कार एकसमान वेगाने मनोऱ्याच्या पायथ्याकडे येत आहे. सहा सेकंदांनंतर, त्या कारचा अवनत कोन $60°$ असल्याचे आढळते. या बिंदूपासून मनोऱ्याच्या पायथ्यापर्यंत पोहोचण्यासाठी कारला लागणारा वेळ काढा. [कठीण]



प्रकरण १०: वर्तुळ

अध्ययन निष्पत्ती (LOs)क्रमांक	अध्ययन निष्पत्ती	प्रश्नांचा क्रमांक
17	स्पर्शिका आणि छेदिका यांची व्याख्या करणे व त्या ओळखणे.	१, २, ३, ४, ७, ८, २०, २१, २४
18	वर्तुळाच्या बाहेरील बिंदूतून काढलेल्या स्पर्शिकांची लांबी समान असते हे तार्किकदृष्ट्या सिद्ध करणे आणि या प्रमेयाचा वापर करून विविध उदाहरणे सोडवणे.	१०, १२, १३, १७, १८, १९, २३, २७, २८, २९, ३३, ३६, ३७, ३९, ४०, ४२, ४३, ४४, ४८, ५०, ५१
19	वर्तुळाची त्रिज्या ही स्पर्शबिंदूपाशी स्पर्शिकेला लंब असते हे तार्किकदृष्ट्या सिद्ध करणे आणि या प्रमेयाचा वापर करून विविध उदाहरणे सोडवणे.	५, ६, ९, ११, १४, १५, १६, २२, २५, २६, ३०, ३१, ३२, ३४, ३५, ३८, ४१, ४५, ४६, ४७, ४९, ५२, ५३

प्रश्नांची संख्या	सोपे	मध्यम	कठीण
53	19	31	3

I. खालील प्रत्येक प्रश्न किंवा अपूर्ण विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्याय निवडा आणि त्या पर्यायाचा अक्षर (अक्षर-क्रमांक) व पूर्ण उत्तर लिहा. (१ गुण)

१) आकृतीमध्ये, वर्तुळाची छेदिका (secant) कोणती आहे? [जून २०२२, सोपे]

A) AB B) PQ C) XY D) MN



२) आकृतीमध्ये, वर्तुळाची स्पर्शिका (tangent) कोणती आहे? [सोपे]

A) MN B) OE C) CD D) AB



(सोपे)

३) आकृतीमध्ये, स्पर्शबिंदू (point of contact) कोणता आहे? (सोपे)

A) P B) C C) D D) E



४) आकृतीमध्ये, O केंद्र असलेल्या वर्तुळाला PA, PC आणि PD या स्पर्शिका काढल्या आहेत.

जर AP = ३ सेमी, CD = ५ सेमी असेल, तर PC ची लांबी किती? [जून २०१९, सोपे]



A) ३ सेमी B) ५ सेमी C) ८ सेमी D) २ सेमी

५) स्पर्शबिंदूपाशी काढलेली स्पर्शिका आणि त्रिज्या यांच्यातील कोन किती असतो? [LO - १९, मार्च २०२२, सोपे]

A) ३० B) ६०° C) ९०° D) १८०°

६) ३.५ सेमी त्रिज्या असलेल्या वर्तुळातील 2 समांतर स्पर्शिकांमधील अंतर किती असते? [मध्यम]

A) ७ सेमी B) १४ सेमी C) ३.५ सेमी D) १.७५ सेमी

७) वर्तुळाला दोन बिंदूंमध्ये छेदणाऱ्या रेषेला काय म्हणतात? [जून २०२०, सोपे]

A) जीवा (chord) B) छेदिका (secant) C) स्पर्शिका (tangent) D) त्रिज्या (radius)

८) वर्तुळाला केवळ एकाच बिंदूत छेदणाऱ्या रेषेला काय म्हणतात? [एप्रिल २०२०, सोपे]

(A) स्पर्शिका (B) छेदिका (C) त्रिज्या (D) जीवा

९) आकृतीमध्ये, O केंद्र असलेल्या वर्तुळाला PA आणि PB या स्पर्शिका आहेत. जर ∠APB = ८०° असेल,

तर ∠AOB चे माप किती? (मध्यम)

A) ८०° B) १००° C) १८०° D) ३६०°



१०) आकृतीमध्ये O केंद्र असलेल्या वर्तुळाला CP आणि CQ या स्पर्शिका आहेत. ARB ही R बिंदूपाशी असलेली आणखी एक स्पर्शिका आहे.

जर CP = 11 सेमी आणि BC = 7 सेमी असेल, तर BR ची लांबी किती?

[मध्यम काठिन्य पातळी]

A) 7 सेमी B) 5 सेमी C) 12 सेमी D) 4 सेमी



11) जर वर्तुळात काढलेल्या दोन त्रिज्यांमधील कोन 130° असेल, तर त्या त्रिज्याच्या टोकांशी काढलेल्या स्पर्शिकांमधील कोन किती असेल? [मध्यम]

A) 90° B) 50° C) 70° D) 40°

12) आकृतीमध्ये, O हे वर्तुळाचे केंद्र आहे. AP आणि AQ या बिंदू A मधून वर्तुळाला काढलेल्या स्पर्शिका आहेत. जर AP = 4 सेमी असेल, तर वर्तुळाची त्रिज्या किती असेल? (मध्यम)

